सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २३ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात

### खासगी वसतिगृहात विद्यार्थीनीची आत्महत्या, शहरात खळबळ

**नाशिक :** नाशिक शहरात खळबळजनक घटना घडली आहे. खासगी वसतिगृहात राहणाऱ्या 17 वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे. अंजली कैलास बागुल असं मृत विद्यार्थीनीचं नाव आहे. अंजली संदीप फाऊंडेशनमध्ये शिक्षण घेत होती. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार,अंजलीने वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावरील तिच्या खोलीत स्कार्फच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### धावत्या शिवशाही बसला भीषण आग; वाचले प्रवाशांचे प्राण



**धुळे :** धुळे शहराजवळील नगाव बारी परिसरात नंदुरबारहून धुळ्याकडे येणाऱ्या शिवशाही बसला बुधवारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. बसमधून धुराचे लोट निघताच चालकाने प्रसंगावधान दाखवत बस तात्काळ रस्त्याच्या कडेला थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. नंदुरबारहून धुळ्याकडे येणारी शिवशाही बस नगाव बारी परिसरात पोहोचली असताना अचानक बसच्या इंजिनाच्या भागातून धूर येऊ लागला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण बसला वेढा घातला. आग पाहताच बसमधील प्रवाशांमध्ये एकच घबराट पसरली.

### जमिनीच्या वादातून काकाला संपवलं, अपघाताचा बनाव रचला अन्...

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यात गारखेडा येथे धक्कादायक घटना घडली आहे. जमिनीच्या वादातून सख्या पुतण्याने काकाच्या डोक्यात काठीने प्राणघातक वार करू हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक म्हणजे यानंतर मृतदेह ओढत नेऊन नाल्याच्या कडेला टाकून अपघात झाल्याचा बनाव रचण्याचा प्रयत्न संशयिताने केला होता. रावेर पोलिसांनी अवघ्या एका दिवसात या खुनाचा छडा लावत संशयिताला अटक केली आहे.

### नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून पाण्याच्या विसर्गात वाढ

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. बुधवारी (२२ जुलै) दुपारी १ वाजल्यापासून बंधाऱ्यातून ४,७६९ क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे. जलसंपदा विभागाच्या पूर नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वी ३,२२८ क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. मात्र दुपारी १ वाजता त्यात १,५४१ क्युसेक्सने वाढ करून एकूण विसर्ग ४,७६९ क्युसेक्स करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण लक्षात घेता येत्या काही तासांत विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# विरोधकांच्या रणनीतीदरम्यान शरद पवार-सुप्रिया सुळे यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीलाच नीट पेपर लीक प्रकरणावरून विरोधकांनी केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. अशा वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना वेग आला आहे. विरोधी पक्ष सरकारला घेरण्याच्या तयारीत असतानाच झालेल्या या भेटीमुळे विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.

मात्र, या भेटीचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील शेती, सिंचन आणि जल व्यवस्थापनाशी संबंधित प्रश्न मांडणे हा असल्याची माहिती समोर आली आहे. शरद पवार यांनी पंतप्रधानांना पत्र देत शेतकरी आणि ग्रामीण भागाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले.

पत्रात शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मिळणारी आर्थिक मदत तातडीने देण्यासाठी प्रक्रिया सुलभ



करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या मदत मंजूर होण्यास मोठा विलंब होत असल्याने डिजिटल पडताळणी करून थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याची सूचना करण्यात आली आहे.

याशिवाय, जल जीवन मिशन आणि सिंचन प्रकल्पांमध्ये झालेल्या विलंबाची स्वतंत्र संस्थेमार्फत चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. अनेक प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि प्रशासकीय अडथळ्यांमुळे कामे रखडल्याचा मुद्दा पत्रात उपस्थित करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी देण्याचीही मागणी करण्यात आली. महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांना सरकारी दराने पिकांची खरेदी होत नसल्याने त्यांना कमी दरात माल विकावा लागत असल्याचे पवार यांनी नमूद केले.

पीक विमा योजनांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी जिओ-टॅगिंग आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य करण्याची तसेच बनावट बियाण्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. हवामान बदलामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती लक्षात घेऊन एनडीआरएफच्या भरपाईच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विरोधकांनी राजकारणासाठी देशाची बदनामी करू नये!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वाढदिवशी सर्व सोहळे टाळत पायी वारीमध्ये सहभागी

**मुंबई :** "विद्यार्थ्यांच्या आशा, आकांक्षा आणि अपेक्षा पूर्ण करणे हे सरकारचे कर्तव्य असून केंद्र व राज्य सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचेच निर्णय घेईल. परंतु, विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय स्वार्थासाठी काही पक्ष देशाची बदनामी करत आहेत, हे अयोग्य आहे," अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली. स्वतःच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सर्व राजकीय व औपचारिक सोहळे टाळून पंढरपूर वारीमध्ये पायी चालत सहभागी झाल्यानंतर ते सोलापूर येथे माध्यमांशी बोलत होते.



दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विरोधकांना टोला लगावताना मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वांनी सर्वप्रथम देशाचा विचार केला पाहिजे. परीक्षा किंवा शिक्षण व्यवस्थेत काही उणिवा राहिल्या असतील तर त्या दूर केल्या जातील आणि सरकार विद्यार्थ्यांच्या मागण्यांशी पूर्णपणे समरस आहे. मात्र, या मुद्द्याचे राजकारण करून देशाची बदनामी करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपल्या वाढदिवशी वारीत सहभागी होण्याबाबत आनंद व्यक्त करताना फडणवीस म्हणाले, "आजच्या दिवशी वारीत चालण्याची आणि जगद्गुरू तुकाराम महाराज तसेच संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शन मिळणे हा अतिशय भाग्याचा योग आहे. वारकरी हे माऊलींचे जिवंत स्वरूप आहेत आणि त्यांचे सानिध्य मिळणे ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. माऊलीकडे काही मागण्याची गरज नसते, तरीही राज्यातील शेतकरी सुखी व्हावा आणि चांगला पाऊस पडावा, हेच साकडे मी घातले आहे."

या वेळी त्यांनी पंढरपूर वारीच्या नियोजनाचे कौतुक केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यंदाच्या वारीतील गर्दीचा अंदाज घेतला जात असून, यंदाच्या वारीने सर्व जुने विक्रम मोडल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हा प्रशासनाने केलेल्या स्वच्छतेच्या व आरोग्य सुविधांच्या नियोजनामुळे वारकऱ्यांची सोय झाली असून, चंद्रभागेच्या वाळवंटातील स्वच्छता आणि जर्मन हँगरसारख्या आधुनिक सुविधांमुळे वारीचे स्वरूप अधिक निटनेटक झाले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# शेअर बाजारात हाहाकार! सेन्सेक्स 800 अंकांनी कोसळला

## गुंतवणूकदारांचे तब्बल 4 लाख कोटी रुपये स्वाहा

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी मोठी घसरण नोंदवली गेली. अमेरिका-इराण संघर्षामुळे मध्यपूर्वेतील तणाव वाढल्याने कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीचा परिणाम भारतीय बाजारावरही झाला. बुधवारी व्यवहाराच्या अखेरीस सेन्सेक्स तब्बल ८०० अंकांनी घसरला, तर निफ्टी ५० निर्देशांकातही मोठी घसरण झाली. या पडझडीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ४ लाख कोटी रुपयांची घट झाली.

जागतिक बाजारातील नकारात्मक वातावरण, वाढत्या भू-राजकीय तणावामुळे परदेशी गुंतवणूकदारांनी विक्रीचा सपाटा लावला. त्याचा थेट परिणाम भारतीय शेअर बाजारावर झाला. बँकिंग, आयटी, ऑटो, मेटल आणि ऊर्जा क्षेत्रातील बहुतांश शेअर्समध्ये विक्रीचा जोर दिसून आला.

मोठ्या कंपन्यांबरोबरच मध्यम आणि लघु कंपन्यांच्या शेअर्सनाही मोठा फटका बसला. निफ्टी मिडकॅप १०० आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० या दोन्ही निर्देशांकांमध्ये सुमारे १ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली. त्यामुळे व्यापक बाजारातही निराशेचे वातावरण पाहायला मिळाले.

विश्लेषकांच्या मते, अमेरिका आणि इराणमधील वाढत्या संघर्षामुळे



आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती वाढत आहेत. भारत हा मोठा तेल आयातदार देश असल्याने कच्च्या तेलाच्या वाढत्या दरांचा परिणाम महागाई, आयात खर्च आणि कंपन्यांच्या नफ्यावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याचे दिसून आले.

सलग तीन दिवस सुरू असलेल्या घसरणीमुळे बाजारातील अस्थिरता वाढली असून, आगामी काळात जागतिक घडामोडी, कच्च्या तेलाचे दर आणि परदेशी गुंतवणूकदारांचा कल यावर भारतीय शेअर बाजाराची दिशा अवलंबून राहणार असल्याचे बाजारतज्ज्ञांचे मत आहे. दरम्यान, बाजारातील या मोठ्या घसरणीमुळे अल्पकालीन गुंतवणूकदारांमध्ये चिंता वाढली असली, तरी दीर्घकालीन गुंतवणूकदारांनी घाबरून निर्णय न घेता परिस्थितीवर लक्ष ठेवावे, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

# खंडणीप्रकरणी पोलीस हवालदार निलंबित

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील एका हवालदारावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. शेअर मार्केट घोटाळाप्रकरणी गुन्ह्यात प्राप्त मागणी तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई टाळण्यासाठी पैशांची केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेतील पोलिस हवालदार दिनेश राठोड याला निलंबित केले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी मंगळवारी रात्री उशिराने कारवाईचा आदेश काढला.

जिल्ह्यातील शेवगाव मार्केट घोटाळ्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. या गुन्ह्यामध्ये यशवंत साहेबराव पाटेकर यांच्याविरोधात आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार करण्यात आली होती आणि या तक्रारींची चौकशी करण्याची जबाबदारी पोलिस हवालदार दिनेश राठोड याच्याकडे सोपविण्यात आली होती. मात्र चौकशी करण्याऐवजी, कारवाई टाळण्यासाठी पाटेकर यांच्याकडे त्याने पैशांची मागणी केली.

यासंदर्भात, तक्रारदार यांनी राठोड व पोलिस उपअधीक्षक गणेश उगले यांच्याविरोधात जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे तक्रार केली. या तक्रारींची चौकशी करण्यात आली. परंतु कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे पाटेकर यांनी कारवाईबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागविली. याचदरम्यान राठोड याचा चारचाकीतून बसून पैसे घेतानाचा एक व्हीडीओ व्हायरल झाला. आणि या व्हिडीओची दखल घेऊन राठोड याला निलंबित करण्यात आले.

पोलिस हवालदार राठोड गेल्या १२ वर्षांपासून आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत होता. त्यामुळे त्याने या विभागात चांगलेच बस्तान बसवल्याचे दिसून येते. अधिकारी बदलले तरी मात्र तो तेथेच काम करत असल्याने त्याला बारकावे माहित होते. दरम्यान आता पोलिस खात्यातील कोण कोणत्या अधिकाऱ्यांचा त्याला आर्शिवाद होता, याचीही चौकशीची मागणी होत आहे.

# दिल्लीत हाय अलर्ट : CJP च्या आंदोलनामुळे सोळा मेट्रो स्टेशन बंद; प्रवाशांची मोठी गैरसोय

## राजधानीत सुरक्षेत मोठी वाढ; वाहतुकीला मोठा फटका

**नवी दिल्ली :** दिल्लीमध्ये सध्या सुरू असलेल्या CJP आंदोलनामुळे शहरात अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने एक अतिशय महत्त्वाचा निर्णय घेत शहरातील तब्बल १६ मेट्रो स्थानके पुढील आदेश मिळेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवली आहेत. या तीव्र आंदोलनाचा सर्वाधिक फटका मध्य दिल्ली आणि संसदेच्या आजूबाजूच्या परिसराला बसला असून, तेथील रस्ते आणि वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.



DMRC ची अधिकृत घोषणा आणि प्रवाशांसाठीच्या सूचना

प्रवाशांना अचानक त्रास होऊ नये म्हणून DMRC ने सोशल मीडियाद्वारे या बदलांची अधिकृत माहिती दिली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव या १६ स्थानकांवरून प्रवाशांना मेट्रो स्टेशनच्या आत येण्यास आणि स्टेशनच्या बाहेर जाण्यास तात्पुरती मनाई करण्यात आली आहे. असे असले तरी, प्रवाशांची पूर्ण अडचण होऊ नये याचीही काळजी घेण्यात आली आहे. राजीव चौक, मंडी हाऊस आणि केंद्रीय सचिवालय या तीन प्रमुख 'इंटरचेंज' स्थानकांवर प्रवाशांना फक्त मेट्रो लाईन बदलण्याची सोय मात्र सुरू ठेवण्यात आली आहे.

'ही' १६ मेट्रो स्थानके बंद

लोक कल्याण मार्ग, राजीव चौक, पटेल चौक, रामकृष्ण आश्रम मार्ग, बाराखंभा रोड, सुप्रीम कोर्ट, सेवा तीर्थ, जनपथ, मंडी हाऊस, केंद्रीय सचिवालय, आयटीओ (ITO), दिल्ली गेट, इंद्रप्रस्थ, खान मार्केट, जोर बाग, शिवाजी स्टेडियम.

CJP च्या आंदोलनामुळे मेट्रो सेवा थांबवण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी २० आणि २१ जुलै रोजी जेव्हा CJP ने संसदेवर मोर्चा काढला होता, तेव्हाही सुरक्षेचा उपाय म्हणून मेट्रो प्रशासनाने काही स्थानके तात्पुरती बंद केली होती. त्यावेळी परिस्थिती शांत झाल्यावर मेट्रो सेवा पुन्हा सुरळीत करण्यात आली होती. आता पुन्हा एकदा आंदोलनाची तीव्रता वाढल्याने पोलिसांनी आणि प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक केली आहे.

# विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जिल्ह्यातील एसआयआर कामाचा घेतला आढावा

## मतदार यादी अचूक, अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी कालमर्यादेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर, दि. 21 :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कामाचा सविस्तर आढावा घेतला. मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त तयार करण्यासाठी प्रत्येक टप्प्यातील काम निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावे, तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कामाचे नियमित परीक्षण करून प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवावे, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, अति. आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, रणजीत पाटील, सह आयुक्त (सामान्य प्रशासन), मंजुषा मिसकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर, तहसिलदार के. के. भदाने यांच्यासह सर्व संबंधित मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. घरोघरी जाऊन प्रत्येक मतदाराची माहिती प्रत्यक्ष पडताळणे, गणना फॉर्म काळजीपूर्वक आणि अचूकपणे भरणे, आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, प्राप्त अर्जांची वेळेत छाननी करून प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढणे आणि कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

श्री. श्रीकांत म्हणाले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम हा मतदार यादी अधिक विश्वासार्ह, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीची जाणीव ठेवून काम करावे. अपात्र नोंदी नियमानुसार व वेळेत वगळाव्यात, तर पात्र मतदारांची नावे अचूकपणे समाविष्ट करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कामात कोणतीही त्रुटी राहणार नाही, यासाठी प्रत्येक स्तरावर प्रभावी समन्वय राखण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीत विधानसभा मतदारसंघनिहाय कामाचा आढावा घेण्यात आला. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, निवडणूक शाखा, तहसील प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करून निर्धारित वेळापत्रकानुसार सर्व उद्दिष्टे पूर्ण करावीत, तसेच प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश देण्यात आले.

# आ. प्रशांत बंब यांच्या हस्ते खुलताबाद ते म्हैसमाळ रस्त्यांच्या कामाचे उद्घाटन संपन्न



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद ते म्हैसमाळ हा रस्ता तांत्रिक अडचणींमुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित होता.आ प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून या रस्त्याला ८ कोटी २३ लक्ष रू निधी मंजूर केला व आज त्या कामाला प्रत्यक्षात उद्घाटन करून सुरवात करण्यात आली

हा रस्ता सहा महिन्यांत पूर्ण होईल असा विश्वास आ प्रशांत बंब यांनी उद्घाटनप्रसंगी बोलताना दिला

या उद्घाटनप्रसंगी कार्यकारी अभियंता स्मिता पवार मॅडम अभियंता दिलीप कोलते, भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, पंचायत समिती सभापती सौ सुनीता खंडागळे, पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे, तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण, रवींद्र चव्हाण,उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ, नगरसेवक शहराध्यक्ष परसराम बारगळ, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, इंजिनिअर सागर सावजी, सौरभ चव्हाण उपस्थित होते.

### मत्स्य सहकारी संस्थेवर मच्छीमार संघटनेची टीका;

# अंत पाहू नका वेळ प्रसंगी आत्मदहन करू - अंकुश बलिया



**माजलगाव (प्रतिनिधी) :** माजलगाव जलाशयात ठेकेदारामार्फत मत्स्यबीज सोडण्यात आल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान मत्स्यबीज आढळून न आल्याचा आरोप मच्छीमार संघटनेने केला आहे. या प्रकरणामुळे स्थानिक मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आली असून, शासनाने तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि स्थानिक मच्छीमारांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मच्छीमार संघटनेचे पदाधिकारी तसेच बीड येथील मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी भास्कर सानप व अजय सोनवणे यांनी माजलगाव जलाशयाची प्रत्यक्ष पाहणी (हेरिंग) केली. या पाहणीदरम्यान संबंधित ठेकेदाराने जलाशयात सोडल्याचा दावा केलेले मत्स्यबीज प्रत्यक्षात आढळून आले नसल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर मच्छीमार संघटनेचे अध्यक्ष अंकुश बलिया यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत जय हनुमान मत्स्य सहकारी संस्था यांच्यावर गंभीर आरोप केले. शासनाची दिशाभूल करून मत्स्यबीज सोडल्याचे केवळ कागदोपत्री दाखविले जात असल्यास ही शासनाची तसेच स्थानिक मच्छीमारांची फसवणूक असल्याचा आरोप त्यांनी केला. अंकुश बलिया म्हणाले की, माजलगाव जलाशयावर अनेक स्थानिक मच्छीमारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न अवलंबून आहे. मत्स्यबीज योग्य प्रमाणात न सोडल्यास मासे उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होऊन मच्छीमारांचे मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार व जबाबदार संस्थेवर कठोर कारवाई करण्यात यावी तर शासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन स्थानिक मच्छीमारांना न्याय दिला नाही, तर मच्छीमार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. वेळ प्रसंगी आत्मदहनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# जिल्ह्यात पीएम राहत योजना प्रभावीपणे राबवा - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड, दि. 20 (जिमाका) :-** देशातील रस्ते अपघातातील मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र सरकारची पीएम राहत योजना ही कॅशलेस उपचार योजना असून अत्यंत फायदेशीर आहे. या योजनेअंर्गत अपघातग्रस्त व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात दाखल केल्यास तातडीने मोफत उपचार मिळतात. तरी रस्ते अपघातातील गंभीर जखमींना तातडीने उपचार मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारची पीएम राहत योजना महत्वाची असून आरोग्य आणि पोलीस प्रशासनाने परस्परांमध्ये समन्वय ठेवून जिल्ह्यात प्रभावीपणे राबवावी, अशी सुचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली.



जिल्हाधिकारी कार्यालयात पीएम राहत योजनेची आढावा बैठक पार पडली. या बैठकीला प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता यांच्यासह पोलिस, आरोग्यसह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

अपघातानंतरचा पहिला तास म्हणजेच गोल्डन अवर हा रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात पैशाअभावी उपचार थांबू नयेत, म्हणून सरकारने ही कॅशलेस सुविधा सुरू केली आहे. यामध्ये कोणत्याही कागदपत्रांची किंवा आगाऊ पैशांची वाट न पाहता डॉक्टर त्वरित उपचार सुरू करतात. ही योजना गरीब आणि गरजू लोकांसाठी खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरणारी आहे. त्यामुळे तिची अंमलबजावणी चोखपणे व्हावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी यावेळी दिले.

### नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा 2.0 अंतर्गत

# मौजे उंबरमुळी येथे महिला शेतीशाळेचे आयोजन



**बीड (प्रतिनिधी ):** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा 2.0 अंतर्गत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, बीड यांच्या वतीने मौजे उंबरमुळी (ता. शिरूर कासार) येथे महिला शेतीशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शेतीशाळेच्या माध्यमातून हवामान अनुकूल तंत्रज्ञान आणि जैविक शेती पद्धतींचा प्रत्यक्ष शेतात अवलंब कसा करावा, याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमादरम्यान हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर केलेल्या विविध घटकांची प्रत्यक्ष शिवार पाहणी करण्यात आली. यामध्ये रुंद सरी वरंबा (BBF) पद्धत, बेडवर लागवड, टोकण यंत्राचा वापर, कीड नियंत्रणासाठी पिवळे व निळे चिकट सापळे आणि नैसर्गिक कीड नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारणे या बाबींचा समावेश होता. यासोबतच, शेतकरी महिलांनी स्वतः तयार केलेल्या जीवामृत, दशपर्णी अर्क आणि गोकृपामृत यांसारख्या जैविक निविष्ठांच्या निर्मिती व वापरावर सविस्तर चर्चा करून पाहणी करण्यात आली.

या प्रसंगी एनडीकेएसपी 2.0 मुंबईचे प्रकल्प उपसंचालक संतोष ममदापुरे आणि प्रकल्प अधिकारी अरुण जाधव यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली व महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे, शिरूरचे तालुका कृषी अधिकारी गांगर्डे, मंडळ कृषी अधिकारी नागरगोजे, प्रकल्प सहाय्यक संदीप वाघुले, पीएसएचआरडी बीडचे प्रदीप जानराव, तंत्रज्ञान समन्वयक नितीन इंगळे, एनआरएम समन्वयक सूर्यकांत जगताप, उपकृषी अधिकारी काटकर, पाणी फाउंडेशनचे मेंटॉर, ढाकणे मॅडम, समूह सहाय्यक पायल काशिद, मोनिका रक्ताटे, पल्लवी खाडे यांच्यासह परिसरातील शेतकरी महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाईच्या आगार प्रमुखाचा गलथान कारभार; खराब गाड्या देवून ग्राहकांना मनस्ताप

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई च्या आगार प्रमुखाच्या गलथान कारभाराने कळस गाठला असून,खराब भंगार गाड्या देवून प्रवाशांना मनस्ताप देण्याचे काम करत आहेत.

अंबाजोगाई बस आगाराच्या प्रमुखांच्या गलथान कारभारामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. आज सकाळी आठ वाजता अंबाजोगाई ते माजलगाव जाणारी ई बस (एम एच 39 बी झेड 8429 क्रमांकाची बस ) व्यवस्थित चार्जिंग न केल्यामुळे वेग घेत नव्हती तसेच तांत्रिक बिघाड असल्यामुळे केज ते धारूर दरम्यान अनेक वेळा वेग घेत नव्हती व बंद पडत होती. धारूर बस स्थानकावर आल्यानंतर वाहकाने अंबाजोगाई आगार




प्रमुखांना फोन करून तांत्रिक बिघाडा संदर्भात कल्पना दिली त्याला कुठलीही मदत न करता गाडी सावकाश चालवा असा मौलिक सल्ला घेऊन गप्प बसवले.

प्रवासी या बिघाडामुळे त्रस्त झाले होते. साध्या गाडीच्या तुलनेत 250 रुपये तिकीट देऊन सुद्धा व्यवस्थित सेवा देत नसल्यामुळे त्यांनी आगार प्रमुखांबद्दल असंतोष व्यक्त केला. या संदर्भात अधिक माहिती घेतली असता सदर बस 78 रुपये प्रति किलो मीटर दराने महाराष्ट्र राज्य परिवहन महा मंडळाने चालविण्यास घेतल्या असून, ही बस एकदा चार्ज केल्यानंतर फक्त दोनशे किलोमीटर चालते. त्यानंतर पुन्हा चार्जिंग करावी लागते. धारूर आगारात चार्जिंग स्टेशन नसल्यामुळे सदर बस स्थानकातच उभी करून दुसऱ्या बसची वाट पाहत प्रवासी ताटकळत बसलेले होते.

दरम्यान सदर ई बस चे दर महिन्याला 8 लाख 30 हजार रुपये भाडे महामंडळाला द्यावे लागते. अतिरिक्त प्रवास भाडे खर्च करून सुद्धा महामंडळ प्रवाशांना व्यवस्थित

# चकलांबा हद्दीत अवैध वाळू वाहतूक, गुटखा विक्री व देशी दारू विक्रीवर धडक कारवाई

### ₹31,98,700/- चा मुद्देमाल जप्त

**बीड :** जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन चकलांबा हद्दीत दिनांक 22/07/2026 रोजी अवैध धंद्यांविरुद्ध विशेष कारवाई करण्यात आली.

पहिल्या कारवाईत, मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने उमापूर-माटेगाव रस्त्यावर सापळा रचून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा (MH23 AU 8500) ताब्यात घेतला. वाहनामध्ये सुमारे 5 ब्रास वाळू आढळून आली. सदर कारवाईत हायवा व वाळू असा एकूण ₹30,30,000/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित वाहन चालक शेख रहीम शेख राजू रा. उमापूर व मालक शेख अहमद शेख महंमद यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यानंतर दुसऱ्या कारवाईत महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा वाहतूक करतांना एक इसम मिळून आल्याने त्याचे ताब्यातून ₹1,02,000/- चा मुद्देमाल जप्त केला असुन नाझीम करीम सौदागर रा. उमापूर याच्याविरुद्ध गुन्ह्या दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तिसर्या कारवाईत, खळेगाव-गेवराई रस्त्यावर संशयित व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडे देशी दारू विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असलेली 180 मिलीच्या 192 बाटल्या, 90 मिलीच्या 50 बाटल्या तसेच वाहतुकीसाठी वापरलेली मोटारसायकल (MH23 BB 3390) मिळून आली. या कारवाईत एकूण ₹66,700/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या तिनही कारवायांमध्ये एकूण ₹31,98,700/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई पोलीस स्टेशन चकलांबा येथे सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समिर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गणेश कऱ्हाडकर, पोलीस अंमलदार हनुमान इंगोले, संदिप गायकवाड, सफौ जमादार यांनी केली आहे.

# जोगाईवाडी शिवारात शेतातील वाद पेटला; चौघांकडून शेतकऱ्याला मारहाण, जीवे मारण्याची धमकी

### नोटीसच्या रागातून हल्ल्याचा आरोप; लाकडी दांडक्याने मारहाण, शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील जोगाईवाडी शिवारात शेतातील वादातून एका शेतकऱ्यावर मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली असून, या प्रकरणी चौघांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौरभ जगदीश जाजू यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेतासंदर्भातील प्रकरणात दिलेल्या नोटीसचा राग मनात धरून आरोपींनी त्यांना अडवून शिवीगाळ केली. तसेच, "शेतात पाऊल ठेवल्यास जिवंत सोडणार नाही," अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

यावेळी एका आरोपीने लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर वार करून दुखापत केली. त्यानंतर इतर आरोपींनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ व धमकी दिल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे.

या प्रकरणी सुनील प्रतापराव लोमटे, तिनित प्रतापराव लोमटे, प्रज्वल सुनील लोमटे आणि महफेज उस्तमराव लोमटे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमांनुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, पुढील कारवाई सुरू आहे.

# माजलगाव बाजार समितीत अजित पवार यांची जयंती साजरी



**माजलगाव (प्रतिनिधी):** माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित दादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, माजी सभापती नितीन नाईकनवरे, संचालक दत्ता डाके, सचिव हरिभाऊ सवणे तसेच बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

# प्रगती साध्यण्यासाठी शिक्षणाची गरज : जितीन रहमान

### आधार माणुसकीच्या उपक्रमांतर्गत एक हजार मुलांना स्कूल कीट वाटप

**अंबाजोगाई :** समाजाची प्रगती साधायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी रविवारी (दि.१९) येथे केले.

येथील संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थांतर्गत आधार माणुसकीचा उपक्रम, विद्यार्थी विकास योजना व पुणे येथील मराठवाडा विकास मंडळाच्या वतीने बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील एक हजार मुलांना शैक्षणिक साहित्याचे कीट वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी जितीन रहमान बोलत होते. अध्यक्षस्थानी ठाणे येथील विद्यार्थी विकास योजनेचे संस्थापक रविंद्र कर्वे हे होते. विद्यार्थी विकास योजनेचे अध्यक्ष संजीव करंदीकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक तथा पोलिस उपअधिक्षक ऋषिकेश शिंदे, रुई रामेश्वर येथील दादाराव कराड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कार्यकारी संचालक आशा बालासाहेब कराड, पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळाचे, शंकरराव चौहान विधी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सौरभ उबाळे,पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे प्रा.रमेश पंडित, वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रा.सौरभ जोशी, ब्रह्मकुमारी प्रज्ञा दीदी, वकील संघाचे अध्यक्ष अशोक कवडे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. दिपक कटारे, आई हॉस्पीटलच्या संचालिका डॉ. सुनिता तोंडगे, प्रताप भिसे यांची प्रमुख उपस्थिती राहाणार आहे.

बीड हा कष्टकऱ्यांचा जिल्हा आहे. कष्ट करणे हीच माझी प्रेरणा आहे. शिक्षणातील कष्ट केले तरच पुढे जाता येते त्यामुळेच समाजाचे चित्र बदलायचे असेल तर हिच प्रेरणा घेऊन पुढे गेले पाहिजे. त्यासाठी शिस्त अंगिकारून माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आपापल्या क्षेत्रात पारंगत झाले पाहिजे असे आवाहनही जितिन रहमान यांनी केले.

**स्वतः**ची ओळख निर्माण करण्यासाठी चुकीच्या मार्गाचा अवलंब करू नका, मदतीची भावना ठेवा असे आवाहन ऋषिकेश शिंदे यांनी केले.

आपल्याला स्कूल कीटच्या माध्यमातून केलेली मदत ही आशेची आणि विश्वासाची आहे. हा विश्वास घेऊन हे विद्यार्थी पुढे जातील. स्वप्न बघायला श्रीमंतीच असावी लागते असे नाही. गरिबीचा विचार न करता, मेहनत व प्रामाणिकपणे प्रयत्न करा, मोठे झाल्यानंतर मातेला व गावच्या मातीला विसरू नका अशी अपेक्षा संजीव करंदीकर यांनी व्यक्त केली. प्रज्ञा दिदी यांनी या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाबरोबरच संस्काराची गरज असल्याचे सांगितले.

आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी संस्थेच्या दशकपूर्तीची माहिती दिली. दहा वर्षात एक हजार विद्यार्थी मदतीसाठी जोडले गेले. समाजाच्या पाठबळावर या उपक्रमाची व्याप्ती वाढत आहे. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी विकास योजनेच्या माध्यमातून आर्थिक बळ मिळत आहे. या बळावरच यावर्षी २१ विद्यार्थ्यांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात १० विद्यार्थ्यांना स्कूल कीट वाटप झाले. विद्यकीय शिक्षण पूर्ण झालेल्या २१ गुणवंत विद्यार्थ्यांचा भेट वस्तू देऊन गुणगौरव झाला. लाभधारक विद्यार्थी व मातांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शिवानंद गुळवे यांनी केले. प्रशांत बर्दापूरकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी आधार माणुसकीच्या उपक्रमांतर्गत सर्व स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

# देवेंद्र पर्व : एका अभ्यासू नेतृत्वाची गाथा



**शंकर देशमुख**
**बीड जिल्हाध्यक्ष, भा.ज.पा.**

काळाच्या प्रवाहात अनेक नेते येतात, सत्ता उपभोगतात आणि इतिहासाच्या पानांमध्ये विरून जातात. पण काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचा प्रवास हा केवळ राजकीय नसतो; तो एका समाजाच्या आशा, विश्वास आणि भविष्यास आकार देणारा असतो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस हे माझ्या दृष्टीने अशाच नेतृत्वाचे प्रतीक आहेत.

त्यांच्याकडे पाहताना मला कधी फक्त एक मुख्यमंत्री दिसत नाही; तर अभ्यास, संयम, निर्णयक्षमता, विकास, संवेदनशीलता आणि राष्ट्रनिष्ठा यांचा सुंदर मिलाफ दिसतो. म्हणूनच मला अनेकदा वाटते—देवेंद्र फडणवीस हे केवळ व्यक्तिमत्त्व नाही, तर महाराष्ट्राच्या नव्या पर्वाचे नाव आहे.

विद्यार्थी चळवळीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास नागपूरचे महापौर, आमदार, विरोधी पक्षनेते आणि मुख्यमंत्री या सर्वोच्च जबाबदारीपर्यंत पोहोचला. हा प्रवास कोणत्याही घराण्याच्या बळावर उभा राहिलेला नाही; तो अभ्यास, सातत्य, लोकसंपर्क आणि संघटन कौशल्य यांच्या बळावर उभा राहिलेला आहे.

माझ्या मनात देवेंद्रजींबद्दल सर्वात मोठा आदर निर्माण करणारी गोष्ट म्हणजे दिलेला शब्द पाळण्याचा त्यांचा प्रयत्न. राजकारणात आश्वासने देणारे अनेक असतात; पण शब्दाला प्रतिष्ठा देणारे नेतृत्व दुर्मिळ असते. कार्यकर्ता म्हणून अनेक प्रसंगांत मला जाणवले की देवेंद्रजी एखादे आश्वासन दिल्यानंतर त्याची पूर्तता करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांच्यावर लोकांचा विश्वास आहे.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी महाराष्ट्रात जनतेच्या मनात स्थान निर्माण केले. त्यांनी राजकारणाला माणुसकीची जोड दिली. देवेंद्रजींकडे पाहताना मला अनेकदा त्या विचारांचा वारसा दिसतो. कार्यकर्त्यांवर प्रेम, सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाणीव, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासन पोहोचविण्याची धडपड आणि अंत्योदयाचा विचार—हे गुण मला त्या परंपरेची आठवण करून देतात.

शेतकरी हा महाराष्ट्राचा कणा आहे. हे केवळ भाषणातील वाक्य नाही, तर शासनाच्या निर्णयांतून ते दिसले पाहिजे. देवेंद्रजींच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी विविध योजना, कर्जमाफी, सिंचन, कृषी विकास आणि अलीकडे कृषी वीजबिलांबाबत जाहीर करण्यात आलेला सुमारे ४८ हजार कोटी रुपयांचा दिलासा हा शेतकरीहिताला प्राधान्य देण्याचा प्रयत्न म्हणून अनेकांनी पाहिला आहे. राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना त्यातून आशेचा किरण दिसला.

समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा, ही त्यांची भूमिका मला नेहमी जाणवली. मराठा समाजाच्या प्रश्नावर त्यांनी अनेकदा स्पष्ट भूमिका मांडली की, "कोणाचेही आरक्षण कमी न करता न्याय्य मार्गाने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न व्हावा." हा समतोल दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.

सारथी संस्थेच्या माध्यमातून असंख्य विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन मिळाले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक तरुण उद्योजक घडविण्याचा प्रयत्न झाला. विविध समाजघटकांसाठी महामंडळे आणि विकासाच्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यकाळात दिसून येतो.

माझ्या दृष्टीने देवेंद्रजींची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची अभ्यासू वृत्ती. एखाद्या विषयावर बोलताना त्यांचा अभ्यास, आकडेवारीवरील पकड आणि प्रशासकीय समज लक्ष वेधून घेते. आजच्या वेगवान राजकारणात अभ्यासाला पर्याय नाही, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

त्यांच्यातील आणखी एक गुण मला नेहमी भावतो. गरज पडली तर ते अत्यंत ठाम भूमिका घेतात. प्रशासनात निर्णय घेण्यास मागे हटत नाहीत. पण वैयक्तिक आयुष्यात ते अत्यंत मृदू, शांत, संयमी आणि सुसंस्कृत आहेत. कठोर निर्णय आणि कोमल मन यांचा असा सुंदर समतोल क्वचितच पाहायला मिळतो.

अटल बिहारी वाजपेयी यांची कविता मला नेहमी आठवते—

"हमें चाहिए ऐसा हृदय,
जो बाधाओं से टूट न सके,
जो दमन के भार से झुक न सके,
जो स्वयं जलकर भी अंधकार मिटाने का संकल्प रखे."

या ओळींचा आशय धैर्य, संघर्ष, आत्मविश्वास आणि लोकहितासाठीच्या समर्पणाचा आहे. मला वैयक्तिकरित्या या मूल्यांची आठवण देवेंद्रजींच्या नेतृत्वाकडे पाहताना होते.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितले—"जो जे वांछील तो ते लाहो." शासनाच्या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचल्या, तरच त्या यशस्वी ठरतात. देवेंद्रजींच्या कामात मला हा अंत्योदयाचा विचार सातत्याने दिसतो.

आज अनेक तरुण राजकारणाकडे वेगळ्या नजरेने पाहतात. त्यांना विकास, सुशासन, पारदर्शकता आणि अभ्यासू नेतृत्व हवे आहे. देवेंद्रजी फडणवीस यांचे व्यक्तिमत्त्व त्या अपेक्षांना प्रतिसाद देणारे वाटते. त्यामुळेच ते अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.

माझ्या दृष्टीने देवेंद्रजींचा सर्वात मोठा विजय कोणत्याही निवडणुकीतील विजय नाही; तर सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेला विश्वास आहे. कारण सत्ता काळानुसार बदलते, पण विश्वास टिकवण्यासाठी आयुष्यभर प्रामाणिकपणे काम करावे लागते.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त मी ईश्वरचरणी एकच प्रार्थना करतो—त्यांना निरोगी, दीर्घ आणि यशस्वी आयुष्य लाभो. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांची ऊर्जा, अभ्यास, संवेदनशीलता आणि नेतृत्व आणखी प्रभावीपणे कार्यरत राहो. राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्याची शक्ती त्यांना लाभो.

देवेंद्रजी हे एका पक्षाचे नेते असतील; पण विकासाचा विचार, अभ्यासू नेतृत्व आणि जनसेवेची भावना ही कोणत्याही पक्षाच्या चौकटीत मर्यादित राहत नाही. ती समाजाची सामूहिक संपत्ती असते. माझ्या दृष्टीने 'देवेंद्र पर्व' म्हणजे अशाच एका अभ्यासू, संयमी, दूरदृष्टी असलेल्या आणि लोककल्याणाचा ध्यास घेतलेल्या नेतृत्वाचा प्रवास आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

■

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## विशेष संपादकीय

# विकासाचा धुरंधर



एकोणविसाव्या शतकात राष्ट्रवादाची ओळख स्वातंत्र्याच्या लढ्याने ठरत होती. विसाव्या शतकात ती लोकशाही संस्थांच्या बळकटीवर ठरू लागली. एकविसाव्या शतकाने राष्ट्रवादाला नवा अर्थ दिला आहे. आता एखाद्या राष्ट्राचे सामर्थ्य त्याच्या लष्करी शक्तीइतकेच त्याच्या अर्थव्यवस्थेवर, पायाभूत सुविधांवर, संशोधनावर आणि नागरिकांच्या उत्पादक क्षमतेवर अवलंबून आहे. लष्करी शक्ती हा विषय सोडला तर इतर सारे राष्ट्रांएवढेच राज्यांना किंवा प्रांतांनाही लागू पडते. विकास हा आता केवळ अर्थकारणाचा विषय उरलेला नाही; तो राष्ट्रीय स्वाभिमानाचा विषय बनला आहे. भारताच्या विकासाकडे आपण सारे तसेच पाहतो. महाराष्ट्राच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्थान याच संदर्भात पाहावे लागते. कारण आज फडणवीसांचा जन्मदिवस आहे आणि त्यांना त्यानिमित्त शुभेच्छा देताना, या धुरंधर विकासपुरुषाच्या कर्तबगारीचे कौतुक करण्याचे निमित्त आहे.

विकास हा आपल्याकडे वापरून-वापरून पार बोथट झालेला शब्द. निवडणुकीत विकास असतो, अर्थसंकल्पात विकास असतो, सरकारी जाहिरातीत विकास असतो आणि प्रत्येक नेत्याच्या भाषणातही विकास असतोच. पण, विकास म्हणजे नेमके काय, हे अनेकांना कळत नाही. स्वातंत्र्यानंतर लोकतांत्रिक संस्था उभ्या करणे, संविधान रुजवणे, निवडणुका घेणे, न्यायव्यवस्था सक्षम करणे हे राष्ट्रनिर्मितीचे अर्थात विकासाचे टप्पे ठरले. आताचा काळ वेगळा आहे. जगातील राष्ट्रे किंवा राज्ये आता उत्पादन व निर्मितीच्या क्षमतेवर अर्थात अर्थकारणाच्या संदर्भात एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. कोण अधिक वेगाने निर्णय घेतो, कोण अधिक भांडवल आकर्षित करतो, कोण उत्पादकता व संशोधनाला चालना देतो, कोण उद्योगांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करतो या प्रश्नांची उत्तरेच त्या राष्ट्राचे किंवा राज्याचे स्थान ठरवतात. आधुनिक राष्ट्रवादाला विकासाचा तोंडवळा प्राप्त झाला आहे तो असा. फडणवीसांच्या कार्यशैलीत या स्थित्यंतराचे दर्शन घडते.

महाराष्ट्राला उद्योगांची, सहकाराची, शिक्षणाची व समाज सुधारणांची परंपरा आहे. तरीही गेल्या काही दशकांत राज्याने आपल्या नेतृत्वाच्या स्थानाबद्दल विशिष्ट गृहीतके स्वीकारली होती. आपण इतरांच्या पुढेच आहोत, त्यामुळे विशेष काही करण्याची गरज नाही, अशी आत्मसंतुष्ट मानसिकता नकळत तयार झाली होती. दरम्यान, इतर राज्यांनी वेग पकडला. गुंतवणुकीसाठी स्पर्धा सुरू झाली. शहरे बदलू लागली. जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले. अशा वेळी महाराष्ट्रालाही स्वतःचा विचार नव्याने करावा लागणार होता. फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र शासनाचे निर्णय या बदलत्या वास्तवातून जन्माला आलेले दिसतात आणि त्यामुळेच त्यांच्या निर्णयांचे दूरगामी परिणाम होताना आपण सारे पाहत आहोत. भविष्यातही त्यांच्या निर्णयांचे सकारात्मक परिणाम दिसणार आहेतच.

राजकारणात काही नेते परिस्थितीशी जुळवून घेतात; काही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करतात. पहिल्या प्रकारचे नेतृत्व व्यवस्थापन करीत काळ काढत असते. दुसऱ्या प्रकारचे नेतृत्व दिशा देते. देवेंद्र फडणवीस हे राज्याच्या व्यवस्थापनासह त्याला दिशा देणारे नेते आहेत. त्यांनी महाराष्ट्राला पुढील काही दशकांच्या चौकटीत पाहण्याचा प्रयत्न केला आणि तशी दिशा दिली आहे. महाराष्ट्राला त्यांनी घटक राज्याच्या पातळीवर न ठेवता जगाच्या स्पर्धेत उतरविले आहे. पायाभूत सुविधा म्हणजे सरकारी खर्च ही जुनी समजूत मोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. चांगली संपर्क व्यवस्था, आधुनिक शहरे, वेगवान सार्वजनिक वाहतूक, सक्षम लॉजिस्टिक्स, औद्योगिक कॉरिडॉर, डिजिटल पायाभूत रचना ही सर्व भविष्यातील संपत्ती-समृद्धी निर्माण करणारी साधने आहेत, हा विचार त्यांनी सातत्याने मांडला. जगात ज्या समाजांनी पायाभूत सुविधांमध्ये धाडसी गुंतवणूक केली, तेच पुढे उद्योग, संशोधन आणि रोजगाराच्या क्षेत्रात आघाडीवर राहिले. महाराष्ट्राची त्याच दिशेने वाटचाल सुरू झाली यामागे फडणवीसांची दूरदृष्टी आहे. जगात जेव्हा-केव्हा भारताचा विचार होतो तेव्हा महाराष्ट्राचा होतोच, हे फडणवीसांच्या दूरदृष्टीचे यश आहे.

फडणवीस यांच्या विकासदृष्टीतील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भौगोलिक वास्तवाकडे पाहण्याची त्यांची पद्धत. त्यांच्यासाठी विदर्भाचे मागासलेपण किंवा मराठवाड्याचा दुष्काळ ही मर्यादा नाही. राज्याचे विविध भाग विकसित होण्यासाठी प्रयत्न करू शकतात आणि त्यासाठी काय करायला हवे, हे फडणवीसांनी दाखवून दिले. योग्य संपर्क-समन्वय, सक्षम पायाभूत सुविधा आणि नियोजन यांच्या आधारे आर्थिक नकाशे बदलू शकतात, यावर त्यांचा विश्वास आहे. गडचिरोली जिल्ह्यात घडून येत असलेले मन्वंतर हे त्याचे ताजे उदाहरण. नक्षलवादामुळे त्रस्त असलेल्या जिल्ह्यात नक्षलवादाचा बीमोड होईल आणि विकासाचा रथ गतिमान होईल, याची कल्पनाही कुणी करत नव्हते. ते घडते आहे आणि त्यामागे देवेंद्रजींची दृष्टी आहे. त्यांचाच निर्धार आहे. देवेंद्रजींच्या कार्यपद्धतीचा आणखी एक गुण म्हणजे निर्णयक्षमता. विकासाचे प्रकल्प फक्त पैशांअभावी अडकत नाहीत; ते निर्णयांअभावी अडकतात. विलंब हा आपल्या प्रशासकीय संस्कृतीचा भाग आहे. शासन वेळेत निर्णय घेऊ शकत नाही, अशी भावना निर्माण झाली की गुंतवणूकदार सावध होतो, उद्योग मागे हटतात आणि नागरिकांचा विश्वास कमी होतो. मग विकास प्रकल्प रखडतात आणि आरोप-प्रत्यारोपांचे तेवढे पीक येते. अशा स्थितीत निर्णय प्रक्रियेला गती देणे हेही विकासाचेच एक रूप असते. फडणवीस यांच्या शैलीत हा आग्रह सातत्याने दिसतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ते विषयांच्या तांत्रिक तपशिलांत शिरतात. आधुनिक काळात निव्वळ भाषणांवर राज्यकारभार करता येत नाही. अर्थव्यवस्था, शहरीकरण, जलव्यवस्थापन, ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा, पर्यावरण, जागतिक गुंतवणूक या सर्व क्षेत्रांतील बदल समजून घेणे नेतृत्वासाठी आवश्यक आहे. फडणवीस यांना अशा अनेक विषयांत गती आहे आणि नवे समजून घेण्यात त्यांना स्वारस्यही आहे. काही नेते सतत स्वतःच बोलतात. इतरांना बोलू देत नाहीत. आपल्याला काहीही समजून घेण्याची आवश्यकता नाही, अशी त्यांची वृत्ती बनते. गेली अनेक वर्षे महाराष्ट्राचे नेतृत्व करताना देवेंद्रजींनी विषय समजून घेण्याची सवय अंगी बाणवून घेतलेली आहे. त्यांच्या माघारी अनेक सनदी अधिकारी व उद्योगपती या कारणासाठी त्यांचे कौतुक करतात. त्यांचा उद्देश स्पष्ट असतो आणि तो म्हणजे काम दर्जेदार आणि वेगाने झाले पाहिजे. फडवीसांनी समृद्धी महामार्ग, अटल सेतू अशा अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या भविष्यात गुंतवणूक केली आहे. त्यांच्या विकासदृष्टीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी महाराष्ट्राला एक राज्य म्हणून नव्हे, तर जगातील स्पर्धक अर्थव्यवस्था म्हणून समोर आणले. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर ते स्वतः गेले. गुंतवणूक नेहमी स्पर्धात्मक राज्यांकडे जाते. त्यामुळे पायाभूत सुविधा, धोरणातील सातत्य, डिजिटल प्रशासन, जलद निर्णय आणि जागतिक दर्जाचे शहरीकरण ही त्यांच्या विकासदृष्टीची अपरिहार्य अंगे बनली. महाराष्ट्राबद्दल आकर्षण निर्माण झाले.

पूर्वीच्या काळात महाराष्ट्राचा विकास अजिबात झाला नाही, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल. मात्र, फडणवीसांच्या पहिल्या कार्यकाळात आणि सध्याच्या कार्यकाळात तो जसा झाला किंवा होतोय, त्याची तुलना भूतकाळाशी होऊ शकत नाही हेही तेवढेच खरे आहे. याचे कारण भविष्याचा वेध घेण्याच्या फडणवीसांच्या कार्यशैलीत दडलेले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आतापर्यंत अनेक नेते सत्तेचे शिल्पकार झालेत. पण खऱ्या विकासाचे शिल्पकार म्हणून ओळख मिळविण्याची संधी फार थोड्यांना मिळाली. त्यातील अव्वल नंबरचे नाव म्हणजे देवेंद्र फडणवीस.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी सर्वाधिक काळ कार्यरत असलेल्या नेत्यांच्या यादीत त्यांचे नाव अलिकडेच आलेले आहे. तो विक्रम त्यांच्या नावे नोंदविला गेला आहे. पुढच्या काळातही अनेक विक्रम फडणवीसांच्या नावे नोंदविले जातील. कारण त्यांनी महाराष्ट्राला दिलेली दिशा आणि त्यासाठी केलेले काम. आपल्या काळाच्या मर्यादा ओलांडून पुढच्या काळासाठी काहीतरी टिकाऊ निर्माण करणाऱ्यांचीच इतिहास नोंद घेत असतो. फडणवीसांची तशी नोंद इतिहासात झालेली आहे आणि त्यामुळेच त्यांना 'विकासाचा धुरंधर' असे संबोधन देताना आमच्या मनात अतीव आनंद आहे. या धुरंधराला जन्मदिनाच्या अनंत कोटी शुभेच्छा! ■

## अभीष्टचिंतन

**नितीन गडकरी**

# देवेंद्रजी : महाराष्ट्राला लाभलेला अमूल्य ठेवा

महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा आज वाढदिवस. महाराष्ट्राची निरंतर सेवा करीत असलेल्या देवेंद्रजींना त्यानिमित्त खूप खूप शुभेच्छा. शालेय जीवनात अतिशय हुशार आणि कुशाग्र विद्यार्थी म्हणून देवेंद्रजींचा लौकिक होता. विधि महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. अनेक वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. लॉ कॉलेजमध्ये असताना विद्यार्थी संघाची निवडणूक लढवली. विद्यापीठ विद्यार्थी संघामध्येही त्यांचा सक्रिय सहभाग होता. विद्यार्थिदशेत त्यांनी केलेली कामगिरी खरे तर भविष्यातील एका परिपक्व नेतृत्वाच्या जडणघडणीची प्रक्रियाच होती. त्याची प्रचीती साऱ्यांनाच आलेली आहे.

त्यांचे वडील स्व. गंगाधरराव फडणवीस जनसंघाच्या काळापासून पक्षाचे कार्यकर्ते होते. मी युवा मोर्चाचा अध्यक्ष असताना गंगाधरराव हे पदवीधर मतदारसंघाचे आमदार होते. त्यांनी नागपूर शहर, जिल्हा तसेच एकूणच विदर्भातील प्रश्नांना विधिमंडळात वाचा फोडली. एम्प्रेस मिलच्या कामगारांसाठी गंगाधरराव, ए. बी. बर्धन यांनी केलेल्या आंदोलनांचा मी साक्षीदार आहे. दुर्दैवाने त्यांना असाध्य आजार जडला आणि प्रकृती खालावू लागली. या पृष्ठभूमीवर देवेंद्रने आता राजकारणात यावे, असे आम्हाला वाटले आणि श्रद्धानंद पेठ वॉर्डातून त्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. मी आणि छोटूभय्या धाक्रस गंगाधररावांना भेटायला गेलो. सरिता वहिनीही तिथे होत्या. आमचा निर्णय आम्ही दोघांनाही सांगितला. गंगाधररावांनी अतिशय नम्रपणे सांगितले की, देवेंद्रने राजकारणात येण्यास माझी हरकत नाही. पण या गोष्टीचा निर्णय देवेंद्रने स्वतः घ्यावा. त्यांची ही भूमिका आजही मी पक्षाच्या सभा-बैठकांमध्ये मांडत असतो. अलिकडे मुलाला तिकीट मिळावे यासाठी आई-वडील आग्रह धरतात. पण देवेंद्र यांना राजकारणात आणून तिकीट द्यावे, अशी मागणी त्यांच्या कुटुंबीयांनी कधीही केली नाही. ती पक्षातील आमच्यासारख्या लोकांनी केली होती. हा आदर्श आज प्रत्येक कार्यकर्त्याने ठेवायला हवा.

महापालिकेच्या निवडणुकीत देवेंद्रजी निवडून आले. त्या काळात जनता युवा मोर्चाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांना मिळाली. नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या भाजपच्या अधिवेशनाच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी देवेंद्रजींवर सोपवण्यात आली होती. देशभरातील कार्यकर्ते याठिकाणी आले होते. उत्तम आयोजनातून देवेंद्रजींनी सर्वांची मने जिंकली. त्यावेळी मी गंगाधररावांच्या जागेवर पदवीधर मतदारसंघाचा आमदार झालो होतो.

पुढे देवेंद्रजींनी पश्चिम नागपुरातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि ते आमदार झाले. मात्र, त्यांचा हा प्रवास एवढा सोपा नव्हता. अनेक आव्हाने होती. पुढच्या निवडणुकीत आम्ही सर्व्हेक्षण केले तेव्हा दक्षिण आणि पश्चिम नागपूरमधून उमेदवार जिंकणे अवघड असल्याचे लक्षात आले. मी देवेंद्रजींच्या कानावर टाकले. त्यांनी देशपांडे सभागृहात पश्चिम नागपूरच्या कार्यकर्त्यांचे संमेलन घेतले. जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला आणि निवडणूक जिंकले. गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वात तरुण व उत्तम संसदपटू म्हणून स्वतःची छाप पाडली. विदर्भ, मराठवाड्याच्या मागासलेपणाचा प्रश्न असो की भ्रष्टाचाराची प्रकरणे असो, देवेंद्रजी आक्रमकपणे मुद्दे मांडत.

त्यावेळी विधानसभेत नारायण राणे तर परिषदेत मी विरोधी पक्षनेता होतो. राणे, मुंडे यांनी देवेंद्रजींना सातत्याने प्रोत्साहन दिले. विषय उपस्थित करून चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी देवेंद्रजींवर सोपवण्यात येत असे. संसदीय कर्तृत्व आणि वक्तृत्वाने त्यांनी सभागृह अक्षरशः गाजवले.



महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी राज्याला समृद्ध, संपन्न केले. शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या अनेक योजना आणल्या. मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक आणली. मी केंद्रात जलसंपदा खाते सांभाळत असताना देवेंद्रजींनी विदर्भातील बंद पडलेल्या सिंचन प्रकल्पांना पुनर्जीवन देण्यासाठी पुढाकार घेतला. गोसेखुर्दसारखे प्रकल्प मार्गी लावले. केवळ विदर्भातील नव्हे तर सोलापूर, सांगली, सातारा येथील योजना देखील पूर्ण केल्या. सिंचनाचा मोठा अनुशेष दूर झाला. देवेंद्रजी यांनी ज्या समस्यांसाठी विधानसभेत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले होते, मुख्यमंत्री झाल्यावर त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी ठोस पावले उचलली, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरच्या विकासात देवेंद्रजींचे मोठे योगदान आहे. जिल्ह्यात नवे प्रकल्प आणण्यासाठी, उद्योगांत गुंतवणूक वाढविण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आणि आजही सुरू आहे. समृद्धी महामार्गाच्या उभारणीचे संपूर्ण श्रेय देवेंद्रजींचे आहे. नक्षल चळवळीमुळे गडचिरोलीचे आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण वाढले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच साडेसात लाख कोटींची गुंतवणूक गडचिरोलीत आली आणि नक्षल समस्येवर नियंत्रण आले. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र किंवा मुंबई-नागपूर असा भेद न करता संपूर्ण महाराष्ट्राचा त्यांनी चौफेर विकास केला. कर्करोगामुळे वडिलांचे निधन झाले. त्यामुळे कर्करोगाच्या रुग्णांची सेवा करण्यासाठी नागपुरात भव्य असे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट त्यांनी उभे केले. यातून देवेंद्र यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडते.

मनमिळावू, नम्र, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून देवेंद्रजींकडे बघितले जाते. त्याचवेळी प्रशासनाच्या बाबतीत अत्यंत कठोर भूमिका घेऊन केवळ महाराष्ट्राच्या विकासाचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यांच्यासारखा धडपड्या, कर्तबगार आणि निष्ठावान नेता हा महाराष्ट्रासाठी अमूल्य ठेवा आहे. त्यांचे भविष्यातील राजकीय आणि सामाजिक योगदान आणखी समृद्ध होवो, हीच त्यांच्या जन्मदिनानिमित्त शुभेच्छा. ■

(केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार)

## प्रासंगिक

**चंद्रशेखर बावनकुळे**

# कर्तृत्व, संयमाची भावनिक गाथा !

जनमानसाचा अचूक वेध घेणारा अभ्यास, संकटाच्या छाताडावर पाय देऊन उभे राहण्याचे अफाट धैर्य, विरोधकांच्या धारदार टीकेला शांतपणे पण तितक्याच प्रभावीपणे परतवून लावण्याचा संयम आणि सहकाऱ्यांना सोबत घेऊन राज्याला प्रगतिपथावर नेण्याची दूरदृष्टी या सर्व गुणांचा समुच्चय म्हणजे देवेंद्रजी! सर्वार्थाने कर्तृत्व, प्रगती, सन्मान, संयमाची भावनिक गाथा म्हणजे देवेंद्रजींचे व्यक्तित्व.

भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, मंत्रिमंडळातील मंत्री आणि गेली साडेतीन दशकांचे आमचे मैत्र म्हणून मला देवेंद्रजींचे प्रगल्भ नेतृत्व अतिशय जवळून अनुभवता येत आहे. त्यांच्यासोबत काम करताना राजकीय परिपक्वता म्हणजे काय असते, याचे उत्तर पावलोपावली मिळते. हा मजकूर केवळ एका मुख्यमंत्र्यांच्या कामाचा ताळेबंद नाही, तर महाराष्ट्राला भरजरी उंचीवर नेणाऱ्या एका संयमी आणि द्रष्ट्या नेत्याच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध आहे.

देवेंद्रजींकडे सर्वांत मोठे अस्त्र आहे ते संयमाचे. सत्तेवर किंवा विरोधी पक्षात असतानाही व्यक्तीचा संयम सुटणे फार सहज असते. पण देवेंद्रजी याला अपवाद आहेत. मी त्यांना अनेक कठीण प्रसंगांत, अत्यंत तणावाच्या वातावरणात पाहिले आहे. जेव्हा संपूर्ण राज्य एखाद्या संवेदनशील मुद्यावरून ढवळून निघत असते, विरोधक चहूबाजूंनी हल्ले चढवत असतात, माध्यमे प्रश्नांची सरबत्ती करत असतात, अशा वेळीही देवेंद्रजींच्या चेहऱ्यावरील शांतता आणि कपाळावर आठी न पडता निर्णय घेण्याची त्यांची क्षमता अचूक असते. त्यांचा हा संयम केवळ वरवरचा नाही, तर तो त्यांच्या आंतरिक संस्कारातून आणि अभ्यासातून आलेला आहे. 'संयम' म्हणजे दुबळेपण किंवा कमजोरपणा नसून, ते सर्वांत मोठे सामर्थ्य आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. कितीही मोठा वाद असो, देवेंद्रजी कधीही आपली भाषा घसरू देत नाहीत. संसदीय मर्यादांचे पालन कसे करावे आणि वैचारिक मतभेद असतानाही समोरच्याचा आदर कसा ठेवावा, याचे ते उत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या या संयमी वृत्तीमुळेच महाराष्ट्रातील अनेक बिकट प्रश्न अत्यंत शांततेत आणि सामोपचाराने सुटू शकले आहेत.

देवेंद्रजींचे नेतृत्व हे केवळ भाषणांपुरते मर्यादित नाही. ते अत्यंत 'डेटा-ड्रिव्हन' (माहितीवर आधारित) आणि अभ्यासू नेते आहेत. मंत्रालयातील फाईल्सचा अभ्यास असो, बजेटमधील तरतुदी असो वा एखाद्या क्लिष्ट कायद्याचा मसुदा, त्यातल्या तांत्रिक त्रुटी आणि सर्वसामान्यांच्या हिताच्या गोष्टी ते तत्काळ हेरतात. पकडतात. त्यांच्या नेतृत्वाची दुसरी जमेची बाजू म्हणजे त्यांची विलक्षण 'निर्णयक्षमता', अनिर्णायकतेच्या गर्तेत अडकलेल्या प्रशासनाला त्यांनी दमदार गती दिली. जलयुक्त शिवार योजना ही त्यांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी आहे. २५ वर्षांपूर्वी पाहिलेले नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात आणले. मुंबईतील मेट्रोचे जाळे, तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून नावीन्यपूर्ण उद्योगनिर्मिती किंवा सद्य महसूल विभागातील ऐतिहासिक सुधारणा ही त्यांच्याच निर्णयक्षमतेची राज्याला मिळणारी फळे आहेत. प्रशासनावर पकड कशी असावी आणि लोककल्याणकारी योजना कशी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवावी, याचे



अचूक कसब त्यांच्याकडे आहे. गतिमान प्रशासन हा त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच महाराष्ट्रात रूढ झालेला शब्द आहे.

मंत्रिमंडळातील सहकारी म्हणून काम करताना मला नेहमीच जाणवले की, देवेंद्रजी हे केवळ आमचे नेते नाहीत, तर ते मार्गदर्शक आणि पाठीशी खंबीरपणे उभा असलेला 'कणा' आहेत. अनेकदा प्रशासकीय निर्णय घेताना किंवा जनतेचे प्रश्न सोडवताना आमच्यासमोर पेचप्रसंग निर्माण होतात. अशावेळी मुख्यमंत्र्यांच्या दालनात गेल्यावर कधीही निराशा पदरी पडत नाही. ते सहकाऱ्यांचे ऐकून घेतात, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देतात आणि जर काम जनहिताचे असेल तर संपूर्ण ताकदीनिशी त्या सहकाऱ्याच्या मागे उभे राहतात. जर एखादी चूक झाली, तर ती चार भिंतींच्या आड समजावून सांगतात, पण जाहीरपणे कधीही आपल्या सहकाऱ्याला कमी लेखत नाहीत. त्यांच्या या विश्वासू आणि आश्वासक स्वभावामुळेच संपूर्ण मंत्रिमंडळ एका टीमसारखे काम करते. माझे निरीक्षण आहे, ते कधीही 'बॉस' बनून हुकूम सोडत नाहीत, तर 'लीडर' बनून सोबत चालतात.

भारतीय जनता पक्षाचा एक कार्यकर्ता म्हणून देवेंद्रजींसोबत काम करण्याचा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा आहे. विलक्षण आहे. निर्णय आणि त्यांची मुद्देसूद अंमलबजावणी यामुळेच भाजपची महाराष्ट्रातील वाढ आणि देवेंद्रजींचे नेतृत्व हे समीकरण एकरूप झाले आहे. पक्षाला कठीण स्थितीतून बाहेर काढणे, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य फुंकणे आणि विचारधारा सर्वसमावेशक पद्धतीने जनतेसमोर मांडणे, यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कोण कार्यकर्ता काय काम करतो आहे, याची माहिती त्यांच्याकडे असते. त्यांच्यासोबत काम करताना कार्यकर्त्याला कायम वाटते, देवेंद्रजी आहेत. सारे नीट होईल. त्यांची साधी राहणी, कार्यकर्त्यांशी असलेले थेट संभाषण आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाण्याची प्रवृत्ती यामुळे ते तळागाळातील कार्यकर्त्यांचे देवाभाऊ बनले आहेत.

निवडणुकीचे मैदान असो की रणनीती, देवेंद्रजींचा राजकीय चाणाक्षपणा आणि पक्षाप्रति असलेली निष्ठा कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारी ठरते. त्यांनी पक्षाला केवळ सत्ता मिळवून दिली नाही, तर सुशासनाचा एक नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. वरवर अत्यंत कणखर आणि प्रशासकीय वाटणाऱ्या देवेंद्रजींच्या आत एक अत्यंत संवेदनशील मन दडलेले आहे. महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी व ग्रामीण भागातील जनता यांच्याविषयी त्यांच्या मनात प्रचंड कळवळा आहे. जेव्हा महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट होते, तेव्हा मंत्रालयात बसून राहण्याऐवजी स्वतः पायपीट करून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अश्रू पुसण्याचे काम करतात. आधार देतात. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून हजारो गावे पाण्यासाठी स्वयंपूर्ण करताना त्यांच्या डोळ्यांत जे समाधान होते, ते खऱ्या लोकनेत्याचे होते. मुख्यमंत्री साहाय्यता निधीच्या माध्यमातून लाखो गरीब रुग्णांना मोफत उपचार मिळवून देणे, हा त्यांच्या संवेदनशीलतेचा मोठा पुरावा आहे.

आज महाराष्ट्र प्रगतीच्या एका अशा टप्प्यावर उभा आहे, जिथे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागाचा विकास या दोन्हीचा समतोल साधणे गरजेचे आहे. हा समतोल कसा साधावा, याचे अचूक व्हिजन देवेंद्रजींकडे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा हा नेता आहे.

यंदाच्या पावसाळी अधिवेशनात त्यांनी घेतलेले निर्णय राज्यातील सामान्य जनतेच्या प्रगतीची आणि सन्मानाची एक भावनिक गाथा आहे. त्यांनी राज्याच्या विकासाचा नवा अध्याय लिहिला. लोककल्याणकारी राज्याची वास्तववादी संकल्पना त्यांनी साकार केली. दिलेला शब्द पाळला आहे. या अधिवेशनात त्यांनी कृषी संस्कृतीच्या काळजाला हात घालणारा अत्यंत भावुक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला. शतकानुशतके शेतात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून अहोरात्र राबणाऱ्या, पण हक्काच्या सात-बारापासून आणि कायदेशीर ओळखीपासून वंचित राहिलेल्या माता-भगिनींना त्यांनी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' च्या माध्यमातून 'स्वतंत्र शेतकरी' म्हणून अधिकृत कायदेशीर दर्जा दिला. जमिनीची मालकी नसतानाही केवळ महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या बळावर त्यांना बँक कर्जे आणि सरकारी योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याचा हा निर्णय म्हणजे राज्यातील शेतकरी महिलांच्या श्रमाचा केलेला सर्वोच्च सन्मान आहे. याशिवाय, महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक बळासाठी स्वतंत्र निधी आणि डिजिटल डेटाबेसची केलेली तरतूद महिलांच्या सक्षमीकरणाला नवी दिशा देणारी ठरली.

दुसरीकडे, अस्मानी संकटांनी खचलेल्या बळीराजाच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी त्यांनी राज्यातील ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य आणण्यासाठी तब्बल ३६,५८५ कोटी रुपयांची ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली. केवळ घोषणा न करता अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी २०,५५२ कोटी रुपयांची तत्काळ तरतूद करून आपल्या शब्दाला कृतीची जोड दिली. राज्यातील ७.५ हॉर्सपॉवरपर्यंतचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांची तब्बल ४८,००० कोटी रुपयांची जुनी थकित वीज बिले पूर्णपणे माफ करण्याची घोषणा केली. शेतीकामांसाठी लागणारे गौणखनिज पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्याचा आणि कमी पावसाच्या सावटाखाली असलेल्या बळीराजाला बियाणे व खतांचा साठा वेळेत पोहोचवण्याचा त्यांचा निर्णय शेतकऱ्यांप्रति असलेली त्यांची तीव्र आत्मीयता आणि कौटुंबिक जिव्हाळा स्पष्ट करतो.

देवेंद्रजींच्या मार्गदर्शनामुळे महसूल विभागाने 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' जाहीर केली आहे. राज्यातील ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, पशुपालनाला चालना आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना आळा घालणे या त्रिसूत्रीवर आधारित हा निर्णय आहे. या योजनेंतर्गत राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांचे बचत गट आणि 'उमेद/माविम' अंतर्गत येणाऱ्या ग्रामसंघांना नाममात्र एक रुपया दराने भाडेपट्ट्याने दिल्या जाणार आहेत. आम्ही एकाच वेळी महिला बचत गटांना रोजगाराची मोठी संधी देत आहोत आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना कायमचा अटकाव करत आहोत. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा भगिनींच्या बचत गटांना यामध्ये विशेष प्राधान्य दिले जाईल.

केवळ शेतशिवारच नव्हे, तर राज्याचा कणा असलेल्या गृह आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातही त्यांच्यातील द्रष्ट्या नेतृत्वाचे दर्शन घडले. कामाच्या ठिकाणी आणि कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, त्यांनी महिला आमदारांची संयुक्त वैधानिक समिती स्थापन केली; तसेच महिला कर्मचाऱ्यांच्या मानसिक व लैंगिक छळाच्या तक्रारींवर एसआयटीमार्फत कठोर कारवाई करत नऊ गुन्हे दाखल करून भगिनींच्या पाठीशी राज्याची संपूर्ण शक्ती उभी केली. स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणून राज्यातील तरुणांचे भवितव्य सुरक्षित करणे, हे सर्व निर्णय देवेंद्रजींच्या अष्टपैलू, कणखर आणि तितक्याच सहृदयी नेतृत्वाची साक्ष देतात. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळताना त्यांनी ज्या पद्धतीचे राजकारण केले, त्याने महाराष्ट्राची मान देशात उंचावली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हाच अजोड गुण आहे की, मित्र असो वा विरोधक, त्यांच्या कर्तृत्वाची आणि संयमाची दखल प्रत्येकालाच घ्यावी लागते.

माझे भाग्य आहे की, मला त्यांच्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री म्हणून राज्याची सेवा करण्याची आणि त्यांच्यासारख्या उत्तुंग नेत्याच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. देवेंद्रजींचे नेतृत्व महाराष्ट्राला दीर्घकाळ मार्गदर्शक ठरत राहील आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली आमचा महाराष्ट्र देशात अव्वल स्थानावर कायम राहील, हा आम्हा सर्व सहकाऱ्यांचा आणि महाराष्ट्रातील जनतेचा ठाम विश्वास आहे. त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा! ■

(महसूल मंत्री, महाराष्ट्र)

(शब्दांकन : रघुनाथ पांडे, माध्यम सल्लागार)

हे पत्र **मालक, सोलापूर तरुण भारत मिडीया लिमिटेड** करिता, **मुद्रक, प्रकाशक** कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत प्लॉट नं. ए- ३२ छत्रपती संभाजीनगर, इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद ४३१००५ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. **संपादक :** विजयकुमार माधवराव पिसे. / **कार्यकारी संपादक :** प्रशांत वसंतराव माने

E-mail - stbaurangabad@gmail.com, Mob : 8888847268

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, published by MR.KULBHUSHANRAM RAMAKRISHNA TARE Printed at CHATRAPATI SAMBHAJINAGAR INDUSTRIAL CO OP SOCIETY, CHATRAPATI SAMBHAJINAGAR 431005.(Maharashtra) **Editor :** Mr.VIJAYKUMAR MADHAVRAO PISE. / **Exicutive Editor** : Mr. PRASHANT VASANTRAO MANE. E-mail : stbaurangabad@gmail.com Mobile : 8888847268.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# काँग्रेसविरोधात भारतीय जनता पक्षाचे हिंगोलीत तीव्र आंदोलन

## विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पोस्टरला मारले जोडे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

काँग्रेस पक्षाकडून नवी दिल्ली येथे थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करून सुरक्षा धोक्यात आणल्याच्या निषेधार्थ बुधवार दि २२ जुलै रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहरातील गांधी चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनादरम्यान संतप्त भाजपा कार्यकर्त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पोस्टरला जोडे मारून काँग्रेसच्या बेजवाबदार वृत्तीचा तीव्र शब्दात निषेध केला.

दिल्लीत काँग्रेसने पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करून जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार पंतप्रधानांच्या सुरक्षेला गंभीर भंग करणारा असून या कृत्याचा जाब विचारण्यासाठी आज दुपारी हिंगोलीतील गांधी चौकात भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन काँग्रेस पक्षाचा धिक्कार असो, पंतप्रधानांच्या सुरक्षेचा खेळ खंडोबा करणाऱ्या काँग्रेसचा निषेध असो अशा घोषणांनी कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. आंदोलनाचा तीव्र निषेध म्हणून कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या पोस्टरला जोडे मारले.

या आंदोलनात माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकूळे, सरचिटणिस उमेश नागरे, सुनीतााताई मुळे, प्रवक्ता विलास गोरे, रजनीश पुरोहीत, पवन उपाध्ये, कैलाश शहाणे, बाबा घुगे, संजय ढोके, नंदु भाऊ खिल्लारे, समिर भिसे, सुनिल राठौर, सदाशिव सुर्यतळ, श्रीरंग राठोड, पदमाकर नायक, हनुमान करहाळे, महेश थोरात, माणिक लोडे, शेख अतिक, सुरज व्यास, केशव सुरदुसे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे म्हणाले की, दिल्लीत पंतप्रधान यांच्या निवासस्थानासमोर बेकायदेशीरपणे खा राहुल गांधी यांनी आंदोलन केले हे लोकशाहीला घातक असून तरूणांच्या खांद्यावर बंदुक ठेवून काँग्रेस राजकीय पोळी भाजण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे परंतु देशातील जनतेला पंतप्रधान मोदी यांच्यावर विश्वास आहे. केवळ राजकीय स्टंटबाजी करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी करीत आहे. राहुल गांधी यांनी बेकायदेशीरपणे केलेल्या आंदोलनाचा भारतीय जनता पक्ष तीव्र शब्दात विरोध करीत आहे.

# अनधिकृत वाळू उपसा प्रतिबंधासाठी यंत्रणांनी समन्वय ठेवावा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या सनियंत्रण समितीला सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

जिल्ह्यातील गौण खनिज वाळूच्या उत्खनन, वाहतूक व साठवणुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून अनधिकृत वाळू उपसा, वाहतूक व साठवणुकीविरुद्ध सातत्याने संयुक्त कारवाई करावी. महसूल, पोलीस, परिवहन, गौण खनिज व संबंधित विभागांनी नियमित तपासण्या करून शासनाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीचे अध्यक्ष राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज आयोजित जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हा खनिकर्म अधिकारी अश्विन माने, पोलीस उपअधीक्षक पी. एम. माकोडे, सहायक वनसंरक्षक एस. आर. माने, सहायक भूवैज्ञानिक डी.एन. बावळे, सहायक कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे विभाग) डी. एस. येस्के, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील वाळू घाटांची सद्यस्थिती, अनधिकृत वाळू उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाया, जप्तीची प्रकरणे, महसूल व दंडवसुली, संवेदनशील भागांतील देखरेख, तसेच विविध विभागांनी केलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अनधिकृत वाळू उपशास प्रतिबंध करण्यासाठी संयुक्त तपासणी पथके अधिक सक्रिय ठेवण्याच्या, रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्याच्या, तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याच्या तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी निरीक्षण करण्याच्या सूचना दिल्या. नदीपात्रातील पर्यावरणीय समतोल अबाधित राहील याची दक्षता घेण्याबरोबरच शासनाच्या धोरणानुसार वाळू व्यवस्थापनाची पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला.

# आ. मुटकुळेंच्याहस्ते आडगाव ते चिंचाळा पाणंद रस्त्याचे भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदन रस्ते योजने अंतर्गत आडगाव-बेलुरा-चिंचाळा पांदन रस्ता कामाचे भूमिपूजन आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या रस्त्याच्या कामासाठी ३६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा वाहतुकीचा प्रश्न निकाली निघणार आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकूडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, के.के शिंदे आदींची उपस्थिती होती. पावसाळ्यात या कच्च्या रस्त्यांवर चिखल होत असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेणे कठीण होत होते. या भागातील शेतकऱ्यांनी आ.मुटकूळे यांच्याकडे ही अडचण मांडली होती यानंतर आ. तान्हाजीराव मुटकूळे यांनी पाठपुरावा करून ३६ लक्ष रुपयांच्या कामाला मंजुरी आणली.

भूमिपूजन प्रसंगी बोलताना आमदार मुटकूळे म्हणाले की, शेतकऱ्यांचे जीवन सुकर करणे आणि ग्रामीण भागाचा विकास करणे हे आमचे मुख्य ध्येय आहे. या शेतपांदन रस्त्यामुळे आडगाव, बेलुरा आणि चिंचाळा परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाणे सोपे होईल, तसेच शेतमालाची वाहतूक करणे अधिक सुलभ होईल. हे काम अत्यंत दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत. या कार्यक्रमाला परिसरातील प्रमुख पदाधिकारी, ग्रामस्थ, शेतकरी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फाळेगाव येथे महाराजस्व अभियान व आरोग्य तपासणी शिबीराला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून महसुलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या संकल्पनेतुन महसूल विभागाच्या वतीने फाळेगाव येथे हिंगोली विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान आणि मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार तान्हाजीराव मुटकूळे हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकूडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, तहसिलदार सखाराम मांडवगडे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, बिडीओ माया वानखडे, के.के शिंदे, सरपंच लक्षमीबाई असोले, फुलाजीराव शिंदे, नारायण खेडकर, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, पवन उपाध्ये, माणीक लोडे, विष्णू भोजे, अय्युब पठाण, माजी सभापती उत्तमराव असोले, पोलीस पाटील कवीतााताई बेले, श्रीरंग राठोड, नंदू खिल्लारे, पदमाकर नायक, सचिन शिंदे, काळे तलाठी यांच्यासह महसूल व आरोग्य विभागाचे विविध अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि महत्त्वाच्या दाखल्यांसाठी अनेकदा शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. हीच अडचण ओळखून प्रशासनाने या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना लागणारे विविध महसूल दाखले, दाखल्यांचे नूतनीकरण आणि शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचे प्रमाणपत्र वाटप थेट एकाच छताखाली अत्यंत पारदर्शकपणे केले थेट गावातच सर्व कागदपत्रे वाटप करण्यात आले.

या अभियानांतर्गत केवळ शासकीय कागदपत्रेच नव्हे, तर नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नेत्र तज्ज्ञ डॉ किशन लखमावार, डॉ. संजय नाकाडे, डॉ.दिपक मोरे, डॉ. मनिष बगडिया यांच्यासह दंत महाविद्यालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात आमदार तान्हाजीराव मुटकूळे म्हणाले की, सर्वसामान्यांच्या दारात शासकीय सेवा पोहोचवणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जनतेला ही हक्काची भेट देण्यात आली आहे. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास त्यांनी यावेळी त्यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त

### मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त दुग्धाभिषेक



हिंगोली- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसानिमित्ताने भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस दुग्धभिषेक करून महापूजा करण्यात आली. तसेच मुख्यमंत्र्यांच्या दीर्घ आयुष्यासाठी व राज्याच्या समृद्धीसाठी श्रीक्षेत्र औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी साकडे घातले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिग ठाकूर, भाजपाचे माजी शिक्षण सभापती पांडुरंग पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सखाराम इंगळे, औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, नगरसेविका अश्विनी पाटील, शहराध्यक्ष बबन सोनुने, गणेश पाटील, विलास काळे, गणेश देशमुख, ॲड एस एस कदम, अनिल भांडे, शंकर काळे, ॲड गणेश ठाकूर, राजू गिरी, महेश जोशी, प्रकाश पोले, विजय पडोळे, श्रीरंग हनवते, कचरू शेळके, नामदेव गिरी, सुधाकर शेळके, माधव वानखेडे, रुखमीनाबाई जळते, सिदबाराव करे, विजय पडोळे, गोपी पडोळे, सतीश यादव, भारत दिंडे, नवनाथ देशमुख, ज्ञानेश्वर पोले, प्रसाद दिंडे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### वंचीतकडून आज जिल्हा बंदचे आवाहन

हिंगोली- दिल्ली येथील जंतर मंतरवरील आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा तसेच अश्रूधूराच्या नळकांड्यांचा मारा यांच्या विरोधात वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने दि २३ जुलै रोजी जिल्हा बंदची हाक देण्यात आली असून येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पूतळ्यापासून वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष शिवाजी खरात, सुनील खिल्लारे, प्रकाश राऊत, विनोद नाईक, योगेश नरवाडे, श्रीमती सुनीता निरगुडे, भूषण पाईकरावख, सगनराव निरगुडे यांनी केले आहे.



हिंगोली- शहरातील बसस्थानक परिसरात जाणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचत असल्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. छाया- विजय गुंडेकर

# मस्तानशहा नगर जन आरोग्य केंद्रात स्व. अजित पवार यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

जन आरोग्य केंद्र नगर परिषद कॉलोनी येथे स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सुमित कांबळे जन आरोग्य केंद्र समिती अध्यक्ष तथा नगरसेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. अजित पवार यांच्या सामाजिक, राजकीय व लोकहितकारी कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. तसेच समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून देण्यात आली.

कार्यक्रमास डॉ.संतोष गिरी, गणेश ठोके, प्रियांका राठोड, कलावती राठोड,स्वाती कांबळे, एम.बांगर, सुनीता सुफळकर, अर्चना खडसे, आरती घोसीर, सर्व कर्मचारी, सदस्य, नागरिक, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण श्रद्धा व आदराने भरलेले होते.

# आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवावी- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम, सतर्क व समन्वयाने कार्यरत राहण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण ठेवावी. संभाव्य आपत्तीच्या प्रसंगी तातडीने प्रतिसाद देऊन नागरिकांचे जीवित व वित्तहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज आयोजित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, पोलीस उपअधीक्षक पी. एम. माकोडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र पुरी, व्ही. एस. निर्मळ, वि. भा. पत्की, डी. एस. येस्के, एस. डी. बेरसले, डी.एन. बावळे आदी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील पर्जन्यमान, नदी-नाले व धरणांच्या पाणीपातळीची सद्यस्थिती, पूरप्रवण गावे, आपत्कालीन निवारा केंद्रांची तयारी, बचाव साहित्याची उपलब्धता, आरोग्य सेवा, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, रस्ते, दूरसंचार व्यवस्था तसेच विविध विभागांनी केलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी प्रत्येक विभागाने आपत्कालीन कृती आराखडा अद्ययावत ठेवावा, नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावा, पूरप्रवण भागांवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याची तयारी ठेवावी, तसेच हवामान विभागाकडून प्राप्त होणाऱ्या इशाऱ्यांनुसार तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश दिले. तसेच महसूल, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, महावितरण, ग्रामीण विकास, नगर परिषद, अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल व राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# हिंगोलीत विविध उपक्रमांनी वनमहोत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

सामाजिक वनीकरण विभाग आणि राज्य राखीव पोलिस बल गट क्र. १२, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२६ रोजी 'वनमहोत्सव २०२६' या उपक्रमाचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजन करून झाली. त्यानंतर आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचा रोप देऊन सत्कार करण्यात आला. पर्यावरण संवर्धन आणि हरित हिंगोलीच्या ध्येयाने प्रेरित होऊन या वेळी वृक्षारोपण करण्यात आले. तसेच नागरिकांना रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी 'रोप विक्री केंद्राचे उद्घाटन' करण्यात आले. उपक्रमाचे औचित्य साधून उपस्थितांसाठी आकर्षण ठरणारे 'सेल्फी स्टँड' देखील या ठिकाणी उभारण्यात आले होते. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, समादेशक सुशांत सिंह, विभागीय वन अधिकारी पुष्पा पवार, सहाय्यक वन संरक्षक विजय कटके, वनपरिक्षेत्र अधिकारी संदीप शिंदे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वन विभागाचे वनपाल संदीप वाघ तसेच वनरक्षक देवराव दिपके, बालाजी जाधव, सुरज शेळके, सुनिता लोने, राजू कोटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच राज्य राखीव दलाचे अतुल अवरगंड आणि इतर कर्मचाऱ्यांसह तुषार भालेराव, शाहू भालेराव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणाचा हा संदेश घरोघरी पोहोचावा आणि पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन या प्रसंगी उपस्थितांनी केले.

### महाराजस्व समाधान' महाशिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

# एकाच छताखाली शासकीय सेवांचा लाभ; शेकडो नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी मुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' अंतर्गत बुधवारी (दि. २२) किनवट येथील गोकुंदा रोडवरील एन. के. गार्डन येथे भव्य महाशिबिर उत्साहात पार पडले. महसूलसह विविध शासकीय विभागांनी एकाच छताखाली नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून दिल्याने शेकडो नागरिकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेतला, तर अनेकांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण करण्यात आले.




महाशिबिराच्या अध्यक्षस्थानी आमदार भीमराव रामजी केराम होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. बी. सरवनन, किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, म ाहूरचे तहसीलदार अभिजित जगताप, किनवटच्या नगराध्यक्ष सौ. सुजाता एंड्रलवार, किनवट पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सौ. जयश्री वाघम ारे, माहूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारीज्ञानेश्वर टाकरस, किनवटचे मुख्याधिकारी मुगाची काकडे, माहूरचे मुख्याधिकारी विवेकानंद कांदे तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

महाशिबिरात महसूल, ग्रामविकास, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, महावितरण, भूमी अभिलेख, परिवहन, पशुसंवर्धन, सहकार आदी विभागांच्या माध्यमातून उत्पन्न, जात व निवासी दाखले, विविध प्रमाणपत्रे, अर्ज स्वीकारणे, तक्रार निवारण, शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन अशा विविध सेवा देण्यात आल्या. पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला, तर अनेक नागरिकांच्या समस्या संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ सोडविल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार भीमराव केराम म्हणाले, राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक पात्र नागरिकाला कोणत्याही अडथळ्याशिवाय शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाभिमुख योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून ग्राम ीण भागातील नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून एकाच छताखाली नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा उपलब्ध करून देणे हा या महाशिबिराचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांना कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, त्यांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण व्हावे आणि पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा, यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे, असे किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी प्रस्तावनेत सांगितले.

कार्यक्रमाची प्रस्तावना तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी केली. आभार प्रदर्शन माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन उत्तम कानींदे यांनी केले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीरास प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २ जुलै -**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी भोकर शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध सामाजीक उपक्रम राबविण्यात आले असून रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ जुलै रोजी शहरात मोंढा परिसरात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. पाऊस सुरू असतांनाही या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवक ,नगरसेवक यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.



शिबिरास आ.श्रीजया चव्हाण यांनी भेट देवून समाधान व्यक्त केले. आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते वृक्षलागवड करून एआय चे व्हीडीओ प्रदर्शन करण्यात आले. शहरात विविध सामाजिक उपक्रमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर,भाजपाचे तालुकाध्यक्ष दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवाडे, शहराध्यक्ष विशाल माने ,गटनेते विठ्ठल पाटील धोंडगे, जितेंद्र देशमुख, केशव पाटील पोमनाळकर, डॉ. बालाजी आंदबोरीकर, उज्वल केसराळे, सारंग मुंदडा, योगेश भोकरकर,डॉ. मनोज गिमेकर, वेणू कोंडलवार, संजय चिंतावार, अवधुत गिरी,गौतम कसबे, विकास क्षिरसागर, सिध्देश्वर पिटलेवाड, अमोल शहांगटवार, अमीत ऱ्याकावार, गोविंद मेटकर, किरण खरोडे, अनिता जाधव, सुनिता राचुटकर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. रक्तदान शिबीरासाठी गोळवलकर गुरुजी रक्तकेंद्राच्या गौरी ठाकूर, निखील सवणे, प्रसाद महाजन ,इंदुबाई सुर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

## स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नांदेड** -महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित अनंतराव पवार यांची जयंती नांदेड जिल्हा परिषदेत साजरी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांच्या हस्ते स्वर्गीय अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. प्रवीणकुमार घुले, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी उपस्थित होते.

# आदमपूरात मृत वानरावर अंत्यसंस्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील शेतकरी बसवंत विश्वनाथ बिद्राळे यांच्या शेतात कुज्याने चावा घेतल्यामुळे एका वानराचा मृत्यु झाला.त्या मृत वानर प्राण्यावर शेतातच बुधवार दि.२२ जुलै रोजी आदमपूर येथील वन्यजीव प्रेमी तरुणांकडून शोकाकुल अंत्यविधी करण्यात आला.

येथील बसवंत बिद्राळे यांच्या शेतात सकाळी ९:३० वाजता एक वानर मृतावस्थेत असल्याचे निदर्शनास आले.गावातील सर्पमित्र तथा वन्यजीव प्रेमी राज मुंडकर यांना माहिती मिळाल्यानंतर काही तरूण सोबतीला घेऊन त्या वानरावर हिंदू रितीरिवाजानुसार एका कडुलिंबाच्या झाडाखाली खोल खड्डा करून मृत वानरास मातीआड



करण्यात आले.यावेळी राजेश मुंडकर,वन्यजीव प्रेमी तथा पत्रकार जाफर आदमपूरकर, ओंकार शिराळे,शंकर कासलवार, सदव बोमडूले, ओम कार बिद्राळे,शिवानंद इंगळे आदि तरूण उपस्थित होते.

## आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयात स्व. अजितदादा पवार जयंती साजरी

**नांदेड**-लोकनेते, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा कर्मवीर स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष, वसंतनगर येथील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, सौ. प्रणिताताई देवरे-चिखलीकर, शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, कार्यालयीन सरचिटणीस श्रीधरराव नागापूरकर, युवक शहराध्यक्ष मोहसीन खान पठाण, मनपा गटनेते साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, युवक कार्याध्यक्ष माधव चिंचाळे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष जमीर पठाण, ड. नाज परवीन, बाळासाहेब सोनकांबळे, मौलाना, ममता सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर म्हणाले, स्व. अजितदादा पवार यांचा वाढदिवस आम्ही दरवर्षी उत्साहात साजरा करत होतो. मात्र, यावर्षी ते आपल्यात नसल्याने त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्याची वेळ आली आहे. त्यांचे कार्य, नेतृत्व आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांवरील प्रेम आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार आपण सर्वांनी करावा.यावेळी उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन केले. कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला.

## गिरीश देशमुख इंग्लिश स्कुल येथे संगीत विभागाचे उद्घाटन!

**उमरी**- स्थानिक गोदावरी शिक्षण संस्था येथे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सतीशजी चव्हाण यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी गिरीश देशमुख इंग्लिश स्कुल च्या नवीन संगीत



विभागाचे उद्धाटन आ सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले
या वेळी तालुक्यातील असंख्य पदवीधर आणि गोदावरी शिक्षण संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' आणि युवकांच्या आव्हानांवर सखोल मार्गदर्शनउद्धाटनपर मनोगत व्यक्त करताना आम दार सतीश चव्हाण यांनी आजच्या आधुनिक युगातील तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले:आजचे जग हे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स मुळे झपाट्याने बदलत आहे. या तांत्रिक क्रांतीच्या युगात युवकांनी स्वतःला अपडेट ठेवणे काळाची गरज आहे.पुढे बोलताना त्यांनी युवक पदवीधरांच्या विविध प्रश्नांवर आणि रोजगाराच्या संधींवर सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. पदवीधरांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले कार्यक्रमाला उमरी परिसरातील गोदावरी शिक्षण संस्थेचा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता. संस्थेच्या वतीने आमदार सतीश चव्हाण यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले संगीत विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कलेचे दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल परिसरातील विद्यार्थ्याची मोठी सोय होणार आहे
या कार्यक्रमांस शिक्षक मुख्याध्यापक समन्वय संघांचे जिल्हा अध्यक्ष डी बी जांभरूनकर मुख्याध्यापक एस एन सुरकुटवार स्वाती वच्चेवार संजय हिवराळे विश्वजित देशमुख ज्ञानेशर कदम बालाजी पाटील शिंदे संदिप मोरे संतोष गुंठे रावसाहेब वडजे रमेश हैबते तालुका समन्वयक जिरेवार इ सह शिक्षक ची मोठ्या सख्यने उपस्थिती होती.

## नांदेड ते हनेगाव नाईट हल्टिंग बस चालू करण्याची भीमशक्ती संघटनेची मागणी

**हानेगाव**-भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने नांदेड ते हनेगाव बस सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. हानेगाव हे कर्नाटक, आंध्रा ,महाराष्ट्र , राज्याच्या सीमेवर अति दुर्लक्षित व दुर्गम भाग असून या या परिसरातील शालेय विद्यार्थी कॉलेजला जाण्यासाठी व कॉलेजच्या ,विद्यापीठाच्या हॉस्पिटलच्या, व शासकीय ,विविध, कामासाठी विद्यार्थी, व्यापारी, कर्मचारी ,शेतकरी, हे मोठ्या प्रमाणात नांदेडसाठी आवक जावक करत असतात हाणेगाव हे देगलूर तालुक्यात सर्वात मोठे गाव असल्याचे निवेदनात नमुद केले आहे. यावेळी भीम शक्ती सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक नगरपालिका देगलूर शत्रुघन दादा वाघमारे, तालुकाध्यक्ष किशोर आडेकर भीमशक्ती सामाजिक संघटना देगलूर, भीमराव भूतनरे तालुका उपाध्यक्ष भीम शक्ती सामाजिक संघटना देगलूर व आदी कार्यकर्ते उपस्थित होते

# लाठीचार्जच्या निषेधार्थ २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंद ; सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २२ जुलै -**

दिल्ली येथे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीचार्ज व बळाच्या वापराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने २३ जुलै रोजी पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणणाऱ्या या घटनेचा वंचित बहुजन आघाडी, नांदेड जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.

संघटनेच्या मते, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार दिलेला असताना विद्यार्थ्यांवर करण्यात आलेली कारवाई ही लोकशाही मूल्यांना धक्का देणारी आहे. त्यामुळे अशा दडपशाहीविरोधात संपूर्ण महाराष्ट्राने एकजूट दाखविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या पार्श्वभूमीवर मा. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी २३ जुलै २०२६ रोजी म



हाराष्ट्र बंदची हाक दिली असून, त्यानिमित्ताने २२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे तातडीची समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था, व्यापारी संघटना, एसटी कर्मचारी, ऑटो रिक्षा युनियन, कामगार संघटना तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, २३ जुलै रोजी सकाळी १० वाजता महात्मा फ ुले पुतळा, आयटीआय कॉर्नर, नांदेड येथे सर्वांनी एकत्र जमून महाराष्ट्र बंद यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी आपल्या-आपल्या भागात शांततापूर्ण व संविधानिक मार्गाने बंद यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा असेही सांगण्यात आले. लोकशाही, संविधान आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक, व्यापारी, कामगार, शेतकरी, एसटी कर्मचारी, ऑटो रिक्षा चालक तसेच सर्व सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नांदेड (दक्षिण) जिल्हाध्यक्ष शंकर गंगाधर महाजन आणि नांदेड (उत्तर) जिल्हाध्यक्ष प्रा. राज अटकोरे यांनी संयुक्तपणे केले आहे.

# जंतर -मंतर येथे होत असलेल्या आंदोलनास हदगांव येथून पाठिंबा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ जुलै -**

नीट पेपर फुटी संदर्भात विद्यार्थ्यांनीच्या भविष्यासाठी देशात अनेक ठिकाणी आंदोलन करण्यात येत आहेत. पेपर फुटीचा तणाव घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपविले आहे. मागील एक महिन्या पासून सोनम वाघचूक, व विद्यार्थी जंतर-मंतर येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करीत आहेत. परन्तु त्यांच्या मागण्यांचा विचार न-करता सोनम वांघचूक यांना जबरदस्तीने आंदोलन स्थळावरून उठवण्यात आले. दि.२० जुलै रोजी लोकशाही मार्गाने अनेक विद्यार्थी व समर्थक जमून आंदोलन करत असतांना पोलीस प्रशासनाने आआंदोलनकांवर क्रूर पणे लाठीमार केला, यात अनेक अल्पवयीन, वृद्धलोक व महिलांना म ोठ्या प्रमाणात दुखापत झाली आहे.



लोकशाही मार्गाने होत असलेल्या आंदोलनावर निर्दयी पणे केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ, पेपरफुटीचे जिम्मेदारी घेऊन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी व जंतर मंतर येथे सुरु असलेल्या विद्यार्थी आआंदोलनच्या समर्थनार्थ आम्ही खालील सही करणार दि. २४/०७/२०२६ पासून तहसील कार्यालय, हदगाव ता. हदगाव जी. नांदेड येथे रविकुमार चव्हाण, मिलिंद पाईकराव व सहकारी उपोषण करणार असल्याचे निवेदन आज तहसील कार्यालय हदगांव येथे देण्यात आले.

# शताब्दी वर्षात राष्ट्रीय जलदिनाची मागणी पूर्ण करावी
## केंद्रीय मंत्री आठवले यांच्याकडे महेंद्र पिंपळगावकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

२० मार्च महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा या मागणीसाठी राज्य व देशपातळीवरील नेत्यांना सातत्याने निवेदने देऊन, भेटी घेऊन प्रयत्न चालू असून काल नांदेड येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेऊन सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षात ही मागणी पूर्ण करावी अशी विनंती या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी केली आहे.

२० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाड (जि. रायगड) येथे पार पडलेला 'चवदार तळे सत्याग्रह' हा भारताच्या सामाजिक समतेच्या इतिहासातील एक क्रांतिकारक प्रसंग आहे. या दिवशी प्रथमच अस्पृश्य समाजाला सार्वजनिक ठिकाणी पाण्याच्या तळ्यावर समान हक्काने प्रवेश मिळाला. हा



दिवस भारतीय संविधानाच्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचा पाया घालणारा म्हणून इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला गेला आहे. सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष शासन स्तरावर साजरे होईल अशी घोषणा सरकारतर्फे करण्यात आली होती. तथापि अद्याप कोणतेही ठोस कार्यक्रम घेण्यात आले नसल्याचे दिसत आहे. २० मार्च हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित व्हावा याकरीता महेंद्र पिंपळगावकर यांनी मागील दोन ते अडीच वर्षापासून आपले प्रयत्न सुरुच ठेवले आहेत. जेष्ठ नेते खा. शरदचंद्रजी पवार, खा. असददोद्दीन ओवेसी, राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खा.डॉ. ज्योतीताई वाघम ारे, वंचितच्या नेत्या अंजलीताई आंबेडकर केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या मागणीचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्यांनी देखील या प्रश्नी आपापल्या स्तरावर प्रामाणिक प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. वेगवेगळ्या धम्म परिषदा, साहित्य संमेलनातून राष्ट्रीय जलदिन व्हावा असा ठराव घेण्यात आला.

केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री ना. रामदासजी आठवले हे नांदेड येथे आले असता पिंपळगावकर यांनी त्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. त्यावर ना. आठवले यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी रिपाइंचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विजयदादा सोनवणे, नगरसेवक प्र. राजू लांडगे, विशाल सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणचे केवळ फोटोसेशन !

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य सामाजिक सेवा उपक्रम अंतर्गत मुदखेड भाजपाच्या वतीने दि.२२ जुलै रोजी ग्रामीण रुग्णालय येथे विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमात ग्रामिण रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप, वृक्षारोपण, आणि टिशर्ट वाटपाचे अयोजन करण्यात आले होते. परंतू या भव्य सामाजिक सेवा उपक्रमात फक्त रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.

पण रुग्णालयातील गार्डन मध्ये आधीच मोठी झाडे असलेल्या परिसरात केवळ एकच रोप लावून त्याचा फोटो काढण्यात आला. आणि एका लहान रोपाभोवती १५ ते २० कार्यकर्ते उभे राहून फोटो काढत आहेत. ज्या ठिकाणी वृक्षांची खरी गरज आहे अशा शाळा,



बसस्थानक, माळरान या ठिकाणी मात्र एकही रोप लावले गेले नाही.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सेवाच संघटना हा संदेश दिला आहे. मात्र मुदखेडमध्ये तो केवळ एका फोटोपूरताच राहिला का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.घोषणा झाली, खरी पण अंमलबजावणी नाही. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांना टी-शर्ट वाटप करण्याची घोषणाही करण्यात आली होती. परंतु ते वाटपही झाले नसल्याचे समोर आले आहे. या उपक्रमाला मुदखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा यांना डावलून हा कार्यक्रम घेण्यात

**टी.सी.हरवली आहे.**

संजीवनी कोंडीबा नायनवाड या नावाची इयत्ता दहावी पासची टी.सी.व इतर कागदपत्रे नांदेड-देगलूर बस प्रवासादरम्यान हरवली आहेत तरी कोनाला सापडल्यास खालील पत्त्यावर किंवा मोबाईल नंबर वर संपर्क साधावा .टी सी व कागदपत्र आणून देणार्यास उचित बक्षीस देण्यात येईल.

**पत्ता:**
**संजीवनी कोंडीबा नायनवाड**
**मुक्काम पोस्ट सुगाव ता.देगलूर जि.नांदेड.**
**मोबाईल नंबर-९९७०६७१५७७**

**जाहिर प्रगटन**

नोंदीचा प्रकार:खरेदी

माहिती मिळाल्याचा दि.१६/०७/२६फेरफाराचा दि.१८/०७/२६लिहून देणार:धनंजय रमेश जोशी रा.भोकर(खाता क्र.३२७) गट/सर्व्हे क्र.५०० लागवडीयोग्य क्षेत्र १.२१०० हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९६हे.आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी लिहून घेणार:इंद्रजित दत्तराम इप्पर(खाता क्र.१२३१९)गट/सर्व्हे क्र.५००लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९६हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.१२७४ दि.२९/०९/२००७ प्रमाणे रक्कम रुपये ३००००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणार्याचे नाव गाव नमूना नं.७/१२ वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्ह्यातील संघटित गोतस्करांविरुध्द कठोर कारवाई करा - शंकर देशमुख

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील नानलपेठ पोलीस ठाणे हद्दीतील लक्ष्मीनगर परिसरात मध्यरात्री अज्ञात व्यक्तींनी कारमधून येऊन गाईला जखमी करून पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी शंकर पांडुरंग देशमुख यांनी पोलीस अधीक्षक आणि नानलपेठ पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांकडे निवेदन देऊन संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, २० जुलैच्या मध्यरात्री ते २१ जुलैच्या पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास लक्ष्मीनगर येथील मुख्य रस्त्यालगत एक गाय बसलेली होती. यावेळी एका चारचाकी वाहनातून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी गाईला जखमी करून तिला वाहनातून पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच चैतन्य प्रमोद केंद्रेकर यांनी महाराष्ट्र पोलिसांच्या डायल ११२ या आपत्कालीन क्रमांकावर तक्रार नोंदविली असून त्यांना तक्रार क्रमांक सीएफएस३८२२८१८४ प्राप्त झाला आहे, असे देशमुख यांनी या निवेदनात म्हटले आहे.

घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असून त्यामध्ये संबंधित वाहन व व्यक्तींची हालचाल दिसून येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन कारवाई करण्यात यावी, तसेच परिसरातील व अन्य मार्गांवरील सीसीटीव्ही तपासण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात संबंधित प्रकारामागे संघटित टोळीचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, यापूर्वी जिल्ह्यात अशाच प्रकारच्या गोवंश चोरी व तस्करीच्या घटना घडल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय गोवंश चोरी प्रकरणात वापरण्यात आलेले वाहन जप्त करावे, जखमी गाईची सुटका करून तिच्यावर उपचार करावेत, तसेच बेकायदेशीररीत्या औषधांचा वापर किंवा पुरवठा होत असल्यास संबंधितांवरही कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

देशमुख यांनी दिलेल्या या निवेदनात भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा तसेच प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांनी प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### दिल्लीतील आंदोलनकर्त्यांवर केलेल्या लाठीहल्ल्याचा काँग्रेसद्वारे निषेध

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** नीट-यूजी परीक्षा पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नवी दिल्ली येथील जंतरमंतर मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनावर सोमवारी (दि. २०) करण्यात आलेल्या लाठीहल्ल्याचा गंगाखेड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने निषेध करण्यात आला. शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात आंदोलन करून विविध मागण्यांचे निवेदन राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.

निवेदनात राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये होणाऱ्या पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नीट-यूजी परीक्षा रद्द होण्यामागील कारणांसह सर्व पेपरफुटी व अनियमित प्रकरणांची न्यायालयीन चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, राष्ट्रीय परीक्षा एजन्सी रद्द करून पर्यायी सक्षम व्यवस्था निर्माण करावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. याशिवाय पेपरफुटीमुळे प्रभावित झालेल्या व आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह मदत द्यावी, जंतरमंतरसह देशभरातील शांततामय आंदोलनाचा अधिकार अबाधित ठेवावा तसेच शिक्षण व्यवस्थेत आवश्यक बदल करण्यासाठी आंदोलकांशी संवाद साधावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

या वेळी गंगाखेड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश पवार, ॲड. लक्ष्मण केंद्रे, भाई गोपीनाथ भोसले, सुरेश इखे, सुनील पौळ, युवक काँग्रेसचे शेख अज्जू, कॉ. ओंकार पवार, कॉ. योगेश फड, अमानुल्ला खान, डॉ. शैलेश कदम, रोहिदास लांडगे, अंकुश कांबळे, सुभाष शिंदे, इक्बाल चाऊस, नामदेव साठे, ॲड. आदित्य शिरसाट, वसंत गेजगे, वामन ढोबळे, अनिल चौरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### तिकीट तपासणी मोहिमेत ५१९ प्रवाशांवर कारवाई : विनातिकीट व अनियमित प्रवास प्रकरणांतून २.५३ लाख वसूल

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी २० जुलै रोजी राबविण्यात आलेल्या विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ५१९ प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईतून दंड व भाडेपोटी एकूण २ लाख ५३ हजार १०५ रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

या विशेष मोहिमेत ३१ तिकीट तपासणी पथकातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत २७ रेल्वेगाड्यांची सखोल तपासणी केली. यामध्ये सचखंड एक्स्प्रेस, देवगिरी एक्स्प्रेस, नांदिग्राम एक्स्प्रेस, पनवेल एक्स्प्रेस, हडपसर एक्स्प्रेस, तपोवन एक्स्प्रेस, काचेगुडा एक्स्प्रेस, रायचूर एक्स्प्रेस यासह अन्य महत्त्वाच्या गाड्यांमध्ये विशेष तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवासाच्या २८५ प्रकरणांतून २ लाख २ हजार ८६५ रुपये, अनियमित प्रवासाच्या १७ प्रकरणांतून ११ हजार ७९० रुपये तसेच नोंदणी न केलेल्या सामानाच्या २१७ प्रकरणांतून ३८ हजार १०५ रुपये वसूल करण्यात आले. या मोहिमेत एकूण ५१९ विनातिकीट, अनियमित प्रवास व नोंदणी न केलेल्या सामानाशी संबंधित प्रकरणे आढळून आली. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांनी नेहमी वैध तिकीट घेऊनच प्रवास करावा, असे आवाहन केले आहे.

रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण करण्यासाठी तसेच विनातिकीट आणि अनियमित प्रवासाला प्रतिबंध करण्यासाठी नांदेड विभागाच्या वतीने अशा विशेष तिकीट तपासणी मोहिमा यापुढेही नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचे दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने सांगितले.

## तालुकाध्यक्ष पदी रायपत्रीवार, सचिव देवकर; जिल्हा संघटकपदी चव्हाण यांची निवड

# व्हाईस ऑफ मीडियाच्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड

**जिंतूर ,/प्रतिनिधी:-** पत्रकारांच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी कार्यरत असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड शुक्रवारी (दि. १७) सर्वानुमते करण्यात आली. संघटनेच्या बैठकीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी सचिन रायपत्रीवार, तर सचिवपदी दिलीप देवकर यांची निवड करण्यात आली. तसेच माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचा गौरव केला. ही बैठक व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख, साप्ताहिक विंगचे प्रदेश उपाध्यक्ष नेमिनाथ जैन, माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, आनंदकुमार मुरक्या, रंगनाथ गडदे, प्रभाकर कुरे आदी मान्यवर उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी मुंजा कंठाळे व किसानप्रसाद खाडे, उपाध्यक्षपदी संदीप माहूरकर, गणेश ठाकूर व श्रीपाद जोशी, सचिवपदी दिलीप देवकर, सहसचिवपदी तुकाराम सर्जे, संघटकपदी प्रशांत मुळी, सहसंघटकपदी पंकज चव्हाण, कोषाध्यक्षपदी रामकिशन ठोंबरे, सहकोषाध्यक्षपदी संतोष तायडे, प्रसिद्धीप्रमुखपदी राम रेघाटे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून आबासाहेब देशमुख, अतुल जगताप, राजू गारकर, शंतनु कुलकर्णी, अशोक उकंडे, शिवानंद कंठाळे, संतोष लहाने व पद्माकर कौसडीकर यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. बैठकीस गुलाबराव शिंदे, चंद्रकांत गवळी, एकनाथ अवचार, अशोकराव उकंडे, यादव मस्के, नितीन बंगाळे, रामा ढगरगे, दीपक राजूरकर, भास्करराव चौधरी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन केले.

चार वर्षांच्या कार्याची दखल; भागवत चव्हाण यांच्यावर जिल्हा संघटकपदाची जबाबदारी व्हाईस ऑफ मीडियाचे माजी जिंतूर तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड करण्यात आली. राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या हस्ते त्यांना निवडपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख यांनी चव्हाण यांनी गेल्या चार वर्षांत संघटनेच्या बळकटीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. नव्या जबाबदारीतून जिल्हाभर संघटना अधिक सक्षम करण्यासाठी कार्य करावे, अशा शुभेच्छाही उपस्थित मान्यवरांनी दिल्या.




### त्या प्रकरणी तिघांना जन्मठेपेची शिक्षा

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या महिलेवर बलात्कार करुन तीची हत्या केल्याच्या प्रकरणात तीघा आरोपींना गंगाखेड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयातील जिल्हा न्यायाधीश व्ही.एम. सुंदाळे यांनी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

५ एप्रिल २०१३ रोजी गंगाखेड येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या एका महिलेवर तीघांनी बलात्कार केला व तीची हत्या केली. या पिडीत महिलेने मृत्यूपूर्व दिलेल्या जबाबातून गंगाखेड पोलिसांनी आरोपींविरुध्द बलात्कार व खूनाचा गुन्हा दाखल केला व गंगाखेडातील अतिरिक्त सत्र न्यायालयात खटला उभा केला. या प्रकरणात सरकार पक्षाने १० साक्षीदार तपासले. त्यामध्ये पिडीतेचा मृत्यूपूर्व जबाब, तो जबाब नोंदविणारे कार्यकारी दंडाधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी तसेच घटनास्थळ पंच यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली. या प्रकरणात तपासणीक अंमलदार हे मयत झाले असल्यामुळे त्यांना तपासण्यात आले नाही.

## पत्नीस विहिरीत ढकलून खून केल्याच्या आरोपातून एकाची निर्दोष मुक्तता

**परभणी,/प्रतिनिधी-** पत्नीस विहिरीत ढकलून खून केल्याच्या आरोपातून एकास येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. एम. सुंदाळे यांनी गंगाखेड बुक्तरवाडी ता.सोनपेठ जि.परभणी येथील आरोपी महादु उर्फ महादेव उत्तम देवकते यांची त्यांनी त्यांच्या पत्नीचा खून केल्याच्या आरोपातून २१ जुलै रोजी निर्दोष मुक्तता केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, बुक्तरवाडी येथील महादु देवकते यांचा विवाह बुक्तरवाडी गावातीलच छायाबाई यांच्यासोबत गेल्या १६ वर्षांपूर्वी झाला होता. परंतु विवाहानंतर छायाबाई व महादेव यांचे नेहमीच आपसामध्ये खटके उडत होते व त्यांचे पटत नव्हते. त्यामुळे छायाबाई बरेचदा तिच्या माहेरी वास्तव्यास राहत असे. घटनेच्या पूर्वी म्हणजे दि. १४-९-२०२४ च्या पूर्वी छायाबाई या नातेवाईकांच्या मध्यस्थीने महादेव देवकते यांच्याकडे नांदावयास आल्या होत्या व महादेव तसेच त्यांचे सर्व कुटुंबीय हे बुक्तरवाडी येथील त्यांच्या शेतामधील आखाड्यावर वास्तव्य करून राहत होते. दि.१४ - ९, २०२४ रोजी छायाबाई व महादेव यांचे सकाळी ८.०० वाजता छायाबाईने यापूर्वी महादेव यांच्यावर केलेली केस काढून घ्यावी या कारणावरून वाद झाला . हे वाद प्रत्यक्ष छायाबाई व महादेव यांची मुलगी ऋतुजा महादेव देवकते हिने पाहिले. ऋतुजा देवकते ही तिच्या आई-वडिलांच्या भांडणानंतर तिच्या शाळेत निघून गेली. त्यानंतर दुपारी २.३० वा. महादेव देवकते हे दि.१४ - ९ - २०२४ रोजी घरी परत आले व छायाबाई शेळ्या चारित असलेल्या शेताकडे घाईघाईने निघून गेली व संध्याकाळी ५.३० वा परत आले व मोटार सायकल व मोबाईल घेऊन घरून निघून गेले. त्यारात्री म्हणजे दि.१४-९-२०२४ ला शेळ्या घरी परत आल्या परंतु छायाबाई परत न आल्याने ऋतुजा देवकते व इतरांनी दि.१५-९-२०२४ ला छायाबाईंचा सर्वत्र शोध घेतला. परंतु छायाबाई आढळून आली नाही. त्याच वेळेस गावातील पोलीस पाटील फुगनर यांना सकाळी ९.०० वा. सुमारास महादेव देवकते यांचा फोन आला व त्यांनी छायाबाईंचा शोध खालच्या विहिरीकडे घेण्याची सूचना पोलीस पाटील यांना केली. त्यावरून पोलीस पाटील हे गावकऱ्यांसमवेत विहिरीकडे गेले असता विहिरीत छायाबाईंचे प्रेत तरंगत असल्याचे दिसले. पोलीस पाटील व गावकऱ्यांनी तसेच पोलीस कर्मचारी लटपटे यांनी छायाबाईंचे प्रेत विहिरीबाहेर काढले. महादेव यास पो. स्टे.सोनपेठ यांनी दि.१६-९,-२०२४ ला अटक केली. तेव्हापासून महादेव हा न्यायालयीन कोठडीत परभणी कारागृहात बंदिस्त होता व त्यांनी पोलीस पाटील बुक्तरवाडी यांना केलेला फोन देखील पोलीस पाटलाच्या भ्रमणध्वनीमध्ये रेकॉर्ड झालेला होता. त्यामध्ये महादेव हा पोलीस पाटलास स्पष्टपणे बोलत होता की, त्यांनी छायाबाई हिला विहिरीकडे जाऊन पहावे. यावरून सरकार पक्षाने तो खून महादेवनेच केला आहे, अशा आशयाचे दोषारोप न्यायालयात दाखल केले होते. गंगाखेड येथे अतिरिक्त सत्र न्यायालयात सरकार पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. या खटल्यामध्ये फिर्यादी ही आरोपीची मुलगी असल्याने व तिनेच स्वतःच्या वडिलांविरुद्ध पो. स्टे.ला आईच्या खुनाची तक्रार दिलेली असल्याने संपूर्ण परभणी जिल्ह्याचे लक्ष या प्रकरणाकडे लागलेले होते. ऋतुजा देवकते हिने न्यायालयामध्ये पूर्ण घटनाक्रम सांगितला. त्याप्रमाणे न्यायालयात पोलीस पाटील फुगनर तसेच पोलीस पाटलाच्या भ्रमणध्वनीतील रेकॉर्डिंग तसेच वैद्यकीय अधिकारी, मयताचे वडील व भाऊ यांची साक्ष घेण्यात आली.

## आषाढी एकादशीनिमित्त नांदेड-पंढरपूर विशेष रेल्वेच्या दोन फेऱ्या; २४ आणि २५ जुलैच्या नगरसुल-पंढरपूर-नगरसुल विशेष गाड्या रद्द

**परभणी,/प्रतिनिधी:** आषाढी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर येथे होणारी अतिरिक्त प्रवासी गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने नांदेड-पंढरपूर-नांदेड दरम्यान दोन विशेष फेऱ्या तसेच नगरसुल-पंढरपूर-नगरसुल दरम्यान एक विशेष फेरी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. याचबरोबर परिचालन विषयक अपरिहार्य कारणांमुळे नगरसुल-पंढरपूर-नगरसुल विशेष रेल्वेगाडीच्या काही फेऱ्या रद्द करण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

गाडी क्रमांक ०७६४५ नांदेड-पंढरपूर विशेष ही २६ जुलै आणि २ ऑगस्ट २०२६ रोजी नांदेड येथून रात्री ८ वाजता सुटेल. ही गाडी पूर्णा, परभणी, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डुवाडी आणि मोडनिंब मार्गे प्रवास करून दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता पंढरपूर येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७६४६ पंढरपूर-नांदेड विशेष ही २७ जुलै आणि ३ ऑगस्ट २०२६ रोजी पंढरपूर येथून सकाळी ८ वाजता सुटेल. ही गाडी मोडनिंब, कुर्डुवाडी, बार्शी टाऊन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, परळी वैजनाथ, परभणी आणि पूर्णा मार्गे त्याच दिवशी रात्री ८.३० वाजता नांदेड येथे पोहोचेल.

याशिवाय गाडी क्रमांक ०७६३७ नगरसुल-पंढरपूर विशेष ही २३ जुलै २०२६ रोजी रात्री ११ वाजता नगरसुल येथून सुटेल. रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन आणि कुर्डुवाडी मार्गे ही गाडी दुसऱ्या दिवशी सायंकाळी ७ वाजता पंढरपूर येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७६३८ पंढरपूर-नगरसुल विशेष ही २४ जुलै २०२६ रोजी रात्री ८ वाजता पंढरपूर येथून सुटून कुर्डुवाडी, बार्शी टाऊन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, लासूर आणि रोटेगाव मार्गे दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३५ वाजता नगरसुल येथे पोहोचेल. या विशेष रेल्वेगाडीत एकूण २४ डबे असतील.

दरम्यान, परिचालन विषयक अपरिहार्य कारणांमुळे गाडी क्रमांक ०७६३१ नगरसुल-पंढरपूर विशेष ही २४ जुलै २०२६ रोजी नगरसुल येथून सुटणारी फेरी रद्द करण्यात आली आहे. तसेच गाडी क्रमांक ०७६३२ पंढरपूर-नगरसुल विशेष ही २५ जुलै २०२६ रोजी पंढरपूर येथून सुटणारी फेरीदेखील रद्द करण्यात आली आहे. दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांना या बदलाची नोंद घेऊन त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे.

### काँग्रेस कार्यालयासमोर भाजपाचे आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी-पंत प्रधानांच्या निवासस्थानासमोर काँग्रेस पक्षाने केलेल्या आंदोलनाचा निषेध करण्यासाठी भाजपाच्यावतीने जिल्हा काँग्रेस कार्यालय शनिवार बाजार येथे निदर्शने करण्यात आली.यावेळी जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे व श्री सुरेश भुमरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.** यावेळी शनिवार बाजार येथील या आंदोलनात मोठया प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आलेली दिसून आली तसेच यावेळी घोषणाबाजीही केली होती



**परभणी : मा. पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर काँग्रेस पक्षाने केलेल्या आंदोलनाचा निषेध करण्यासाठी भाजपाच्यावतीने जिल्हा काँग्रेस कार्यालय शनिवार बाजार येथे निदर्शने करण्यात आली.यावेळी जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे व श्री सुरेश भुमरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.**

## जागतिक शांततेसाठी योग हाच एक प्रभावी मार्ग; अमेरिका, इराण व इजराईलच्या नेत्यांनी भारतात योग प्रशिक्षणासाठी यावे-सानप

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** जगभरात सध्या सुरू असलेले युद्धजन्य वातावरण व त्यात अमेरिका, इराण आणि इजराईल यांच्यातील वाढत चाललेला तणाव आणि त्यातून निर्माण होणारी मानवी व आर्थिक हानी हया बाबी लक्षात घेता, संपूर्ण जगात शांततेसाठी योग व प्राणायाम आणि ध्यानाचा प्रचार , प्रसार होणे ही काळाची खरी गरज असल्याचे प्रतिपादन जिंतूर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व शासकीय योग प्रशिक्षक वैद्य शिवप्रसाद सानप यांनी आज उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

मेडिटेक हॉस्पिटलच्या नित्य योग व प्राणायाम वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.




यावेळी त्यांनी सांगितले की, योग ही केवळ व्यायामपद्धती नसून मन, बुद्धी आणि भावनांचा समतोल साधणारे एक उत्तम भारतीय जीवनदर्शन आहे. योगामुळे ताण-तणाव कमी तर होतोच पण आपली निर्णयक्षमता वाढते त्यामुळे क्रोध , राग , द्वेष व आक्रमकतेवर अगदी सहज नियंत्रण प्राप्त करता येऊन शांततापुर्व संवादाला चालना मिळते.

वैद्य सानप यांनी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना आवाहन करताना सांगितले की, दि. २१ जून २०२७ रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अमेरिका, इराण आणि इजराईल या देशांच्या प्रमुखांना भारतात निमंत्रित करून भारतीय योगगुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांना योग व प्राणायाम आणि ध्यानाचे विशेष प्रशिक्षण आयोजित करुन याद्वारे भारताचा ''वसुधैव कुटुंबकम्'' हा संदेश संपूर्ण जगापर्यंत पोहोचवायला शांततेसाठी एक नवे दालन खुले होईल. ''योग हा युद्धाचा नव्हे, तर शांततेचा मार्ग आहे. शस्त्रांपेक्षा संयम, संघर्षापेक्षा संवाद आणि वैरापेक्षा मानवता ही अधिक सामर्थ्यवान आहे,'' असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमात संजीवन व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. योगेश दहिफळे यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी तसेच कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रत्येकाने दररोज नित्य योग व प्राणायाम आणि ध्यानाचा नियमित सराव करावा. निरोगी व्यक्ती, निरोगी कुटुंब आणि निरोगी समाज घडविण्यासाठी योग ही प्रभावी जीवनशैली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील डॉ ज्ञानेश्वर मुटकुळे , डॉ भागवत सांगळे , डॉ निशांत मुंढे , डॉ शाम बोरा , दामोधर सांगळे , बालाजी राख व सर्व सामाजिक कार्यकर्ते आणि योगसाधक बांधव उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# भाजपा; काँग्रेस आमने-सामने; राहुल गांधींच्या आंदोलनाचा जालन्यात निषेध

## काँग्रेस कार्यालयासमोर भाजप जालना महानगरचे जोरदार शक्तिप्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

दिल्लीत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शासकीय निवासस्थान परिसरात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्ष, जालना महानगरच्या वतीने आज (दि.२२) काँग्रेस खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या कृतीचा निषेध करत घोषणाबाजी केली.

यावेळी भाजपच्या वतीने प्रतिपादन करण्यात आले की, पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थान परिसरात आंदोलन करणे ही संसदीय परंपरा, घटनात्मक मूल्ये आणि लोकशाही संस्थांचा अवमान करणारी कृती असून, अशा प्रकारच्या राजकारणामुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेला धक्का पोहोचतो. राजकीय मतभेद व्यक्त करण्यासाठी लोकशाहीमध्ये अनेक वैधानिक मार्ग उपलब्ध असताना अशा पद्धतीने आंदोलन करणे योग्य नसल्याची भूमिका भाजपच्या वतीने मांडण्यात आली. भाजपने काँग्रेसच्या नेतृत्वावर टीका करत अशा प्रकारच्या आंदोलनातून देशात संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. तसेच, देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदांचा आणि संस्थांचा सन्मान राखणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची जबाबदारी असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आंदोलनामध्ये माजी आमदार कैलास गोरंटयाल, जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, नारायण पवार, नगरसेवक अक्षय गोरंटयाल, रमेश गौरक्षक, सखुबाई पणबिसरे, जगदीश भरतिया, नंदकिशोर गरदास, मनोज जोशी, आनंद झारकंडे, संजय पाखरे, कल्याण भदनेकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, बाबुराव पवार, नागेश अंभोरे, गोपाल पवार, बापू साळवे, रोहित भूरेवाल, नितीन कानडे, निलेश गोर्डे, कार्तिका मनोज इंगळे, मुकेश चव्हाण, रणजीत बनवारी, राजाराम जाधव, बद्री भसांडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जालना येथे जागेवर निवड संधी प्लेसमेंट ड्राईव्हचे २४ जुलै रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी आणि मार्गदर्शन उपलब्ध करण्याच्या उद्देशाने रोजगार स्वयंरोजग-ारसहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. यानुसार जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे मार्फत शुक्रवार, दि. २४ जुलै, २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जिल्हाधिकारी कार्यालय दुसरा मजला,जालना येथे प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन सकाळी ११ ते २ दरम्यान करण्यात आले आहे.

याकरिता गरवारे हायटेक प्रा. लि. छत्रपती संभाजी नगर यांचे दहावी, बारावी, पदवीधर उत्तीर्ण युवक-युवती करिता अप्रेंटिसचे १० पदे, तसेच अजित सीड्स प्रा. लि. छत्रपती संभाजी नगरचे दहावी, बारावी, पदवीधर उत्तीर्ण युवक-युवती उत्तीर्ण करिता अप्रेंटिसचे १० पदे, त्याचप्रमाणे स्वामी विवेकानंद नागरी सह पतसंस्था मर्या,जालना यांची कोणतीही पदवी उत्तीर्ण तसेच एम.बी.ए. मार्केटिंग पदवीधर यांची मार्केटिंग एक्झिक्युटिव्हसाठी १५ पदे अशी एकूण ३५ रिक्त पदे प्राप्त झाली आहेत. यामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने मध्ये देखील प्रशिक्षणासाठी काही पदे भरण्यात येणार आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रताधारक उपस्थित होणाऱ्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध होणार आहे .जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहितीसाठी विभागाच्या ु.लाूझ्रा.रिहरीुरूरा.र्सीं.ळप त्याच प्रमाणे केंद्र शासनाच्या ु.पली.र्सीं.ळप या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होमपेज वरील नोकरी साधक (गेल ड्शशज्ञरी) लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्याआधारे लॉगिन करावे. त्यानंतर जागेवर निवड संधी (२०२५-२०२६) प्लेसमेंट ड्राईव्ह ०३ या बटनावर क्लिक करून जालना जिल्हाची निवड करावी. उद्योजक / नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांसाठी अर्ज करावा. मुलाखतीसाठी बायोडाटा किमान दोन प्रती सोबत ठेवून शुक्रवार, दि. २४ जुलै, २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जिल्हाधिकारी कार्यालय दुसरा मजला, जालना येथे उपस्थित रहावे असे आवाहन सहायक आयुक्त, ककौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### दैठना खुर्द येथील नामदेव गाडेकर यांचे पंढरपूर वारीत निधन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील दैठणा खुर्द येथील वारकरी नामदेव लक्ष्मण गाडेकर (वय ७०) यांचे पंढरपूर वारीदरम्यान २१ जुलै २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते दैठणा खुर्दचे माजी सरपंच सोनाजी गाडेकर यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नामदेव गाडेकर हे विठ्ठलाच्या ओढीने पंढरपूर वारीत सहभागी झाले होते. वारीदरम्यान अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांचे निधन झाले. विठ्ठलभक्तीत तल्लीन असतानाच वारीत झालेल्या त्यांच्या या आकस्मिक निधनाने वारकरी संप्रदाय व गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

दि२२ जुलै २०२६ रोजी दैठणा खुर्द येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक, नातेवाईक आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ असा मोठा परिवार आहे.

## आरटीओची केवळ 'फेरी' की कारवाई? नागरिकांमध्ये संभ्रम, निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह!

» बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौकासह विविध भागांची पाहणी; मात्र एकाही वाहनावर कारवाई केली नसल्याची चर्चेला मोठे उधान



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा शहरात मंगळवार, दि. २१ रोजी जालना येथील प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बसस्थानक परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच शहरातील विविध ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. मात्र या भेटीदरम्यान कोणत्याही वाहनावर कारवाई करण्यात आली नसल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

शहरात अनेक ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन, अवैध प्रवासी वाहतूक, रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत असतानाही आरटीओ विभागाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

आरटीओ अधिकारी शहरात आले, विविध ठिकाणी फेरी मारली; पण नेमकी तपासणी काय झाली आणि कारवाई का झाली नाही? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. त्यामुळे ही केवळ औपचारिक पाहणी होती की नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई टाळण्यात आली, याबाबतही चर्चा रंगू लागली आहे.

आरटीओ विभागाने या भेटीदरम्यान किती वाहनांची तपासणी केली, किती वाहनांवर दंडात्मक कारवाई झाली किंवा कोणत्या कारणामुळे कारवाई झाली नाही, याबाबत अधिकृत माहिती जाहीर करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरातील वाहतूक शिस्त राखण्यासाठी संबंधित विभागाने नियमित आणि प्रभावी कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महारक्तदान संकल्पः देवाभाऊंना रक्तदानातून शुभेच्छा! भाजपाच्या रक्तदान शिबिरास घनसावंगीत उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अबड दि २१ जुलै महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समृद्धी साखर कारखाना येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिरास पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजसेवेचा संकल्प प्रत्यक्ष कृतीत उतरवत रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना रक्तदानातून अनोख्या शुभेच्छा दिल्या*
.

भाजपा जिल्हाध्यक्ष तथा बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. नारायणभाऊ कुचे आणि समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात २१५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीचे रक्तदान प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जनकल्याण रक्तपेढीचे शिवराज जाधव व त्यांच्या संपूर्ण टीमचे मोलाचे सहकार्य लाभले. या सामाजिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान करणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार. या रक्तदानातून अनेकांना नवजीवन मिळेल, असा विश्वास व्यक्त करत हेच या उपक्रमाचे सार्थक आणि खरा आनंद असल्याच्या भावना सतीश घाटगे यांनी व्यक्त केल्या. या शिबिरास भाजपाचे शहागड मंडळ अध्यक्ष शिवाजी मोरे, घनसावंगी मंडळाचे प्रभारी तथा तालुका अध्यक्ष विष्णुपंत जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवनराव वगरे, खरेदी-विक्री संघाचे संचालक नकुल तनपुरे, बाजार समितीचे संचालक बालाजी खोजे, भाजपा तालुका उपाध्यक्ष भगवान बर्वे, प्रेमानंद उढाण, रामेश्वर गरड, राजकुमार उगले, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव बोबडे यांच्यासह

## स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त परतूरमध्ये विविध सामाजिक उपक्रम संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

लोकनेते तथा महाराष्ट्राच्या राजकारणात जनसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त परतूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नितीन जेथलिया यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.०० वाजता सरकारी दवाखाना, परतूर येथे करण्यात आली. यावेळी उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. त्याचबरोबर रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यानंतर सकाळी ११.०० वाजता दृष्टी लॉयन्स, परतूर येथे रुग्णांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. गरजू व उपचाराधीन रुग्णांना आवश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्यात आले. दुपारी १२.०० वाजता स्नेहांकुर अनाथ आश्रम येथे अनाथ व निराधार बालकांना अन्नदान करण्यात आले. बालकांसोबत प्रेमाने संवाद साधत त्यांना भोजन देण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी, मानवता आणि सेवाभावाचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचला. यावेळी नितीन जेथलिया यांनी सांगितले की, समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणे, हीच लोकनेत्यांच्या विचारांना खरी अभिवादनाची भावना आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सर्व उपक्रमांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे, इंद्रजित घनवट, शहराध्यक्ष प्रमोद जगताप, नगरसेवक बाबुराव हिवाळे, राजेश खंडेलवाल, शाकेर खतीब, मंगेश डहाळे, वसीम सय्यद, सिद्धू अंभुरे, दत्ता अंभुरे, गणेश ढवळे, विष्णुपंथ तनपुरे, शाकेरभाई मापेगावकर, अनिल आंबेकर, कम्मू पठाण, मोसीन बागवान, उबाळे, मुजमुले, सुरेश भंडारी, कांतराव सोळंके, बद्रीभाऊ खवणे, डॉ. केशरखाने, संकेत अंभुरे, अजीम पठाण, विशाल पवार, रफिक कुरेशी, सोनू धुमाळ, सौरभ अंभुरे, राहुल अंभुरे, एकनाथ बोनगे, विठ्ठल राऊत, शोएब सिद्दीकी, सचिन बोंबले, अमोल अंभुरे तसेच पक्षाचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विद्यार्थिनींच्या आरोग्याशी खेळ? कस्तुरबा गांधी वसतिगृह प्रकार भोजनानंतर मुली आजारी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा शहरातील कस्तुरबा गांधी बालिका वस्तीग्रहात४ अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून, भोजन केल्यानंतर सुमारे ७ ते ८ विद्यार्थिनींना उलट्या, जुलाब, चक्कर आदी त्रास सुरू झाल्याने त्यांना तातडीने मंठा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या संबंधित विद्यार्थिनींवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या घटनेमुळे कस्तुरबा गांधी बालिका वस्तीग्रह भोजन व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. विद्यार्थिनींच्या आरोग्याशी संबंधित इतक्या गंभीर प्रकारानंतर विद्यालय प्रशासन व गृहप्रमुख यांच्या कामकाजाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठवून विषबाधेचे नेमके कारण शोधावे, तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच अन्न व भेसळ प्रतिबंध विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## एसआयआर अभियानात आ.अर्जुनराव खोतकरांचा सहभाग; नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना : १०१ जालना विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, शिव-सेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर यांनी सध्या सुरू असलेल्यामतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (ड्खठ) अभियानात सहभाग नोंदवून स्वतः इड्ज माणिक राठोड यांच्याकडून परिवारासह एसआयआर प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी त्यांनी मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन मतदार यादी अद्ययावत करून घ्यावी, असे आवाहन केले.



आ. खोतकर म्हणाले की, मतदार यादी अचूक आणि अद्ययावत असणे ही सक्षम लोकशाहीची मूलभूत गरज आहे. प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या नावाची नोंद, दुरुस्ती किंवा आवश्यक बदल वेळेत करून घेणे आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत राबविण्यात येत असलेल्या या विशेष अभियानाचा प्रत्येक नागरिकाने लाभ घ्यावा.यावेळी त्यांनी नागरिकांना आपल्या कुटुंबातील सर्व पात्र मतदार, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांनाही या अभियानाची माहिती देऊन एसआयआर प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराची अचूक नोंद महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा सर्वात मोठा अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीतील आपली माहिती पडताळून आवश्यक त्या दुरुस्ती करून घ्याव्यात. कोणताही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, काही अडचणी असल्यास शिवसेनेने नियुक्त केलेले बि.एल. ए. शासनाने नेमलेल्या इड्ज सी संपर्क करावा असे आवाहन आ. अर्जुनरावजी खोतकर यांनी केले. मतदारसंघातील सर्व नागरिकांनी निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (ड्खठ) अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे आणि एसआयआर प्रक्रिया पूर्ण करून लोकशाही बळकट करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.